जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
# नवा मराठा
फोन–२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

## चॅम्पियन्स ऑफ द अर्थ– डॉ. गाडगीळ

ज्येष्ठ देशभक्त, अर्थतज्ञ स्व. धनंजय गाडगीळ यांचे तितकेच कर्तृत्ववान अन् समाजभान असलेले पुत्र म्हणजे पर्यावरण शास्त्रज्ञ डॉ. माधवराव गाडगीळ.

आज त्यांच्याबद्दल जाणून घेण्याची आपणा सर्वांनाच गरज आहे. त्यांनी पर्यावरण विषयी गेली ५ दशके केलेले कार्य खूप मोठे आहे.


संयुक्त राष्ट्रातर्फे एक सर्वोच्च जागतिक पर्यावरण पुरस्कार दिला जातो तो म्हणजे 'चॅम्पियन्स ऑफ द अर्थ' – अर्थात या क्षेत्राचा जीवनगौरव. यंदाचा हा सन्मानाचा पुरस्कार त्यांना मिळाला आहे. पृथ्वीचे संवर्धन, संरक्षण आणि जनसमूह यासाठी जीवन समर्पित करणाऱ्यांना हा पुरस्कार दिला जातो.

डॉ. माधव गाडगीळ हे अथक संशोधन व सक्रीय लोकसहभागाद्वारे पृथ्वी–पर्यावरण रक्षणासाठी झटत आहेत. त्यांनी शास्त्रज्ञ म्हणून मनापासून, वस्तुनिष्ठ पद्धतीने, तर्कशुद्ध मांडणी करत कार्य केले. त्यासाठी संपूर्ण देशभर फिरून, आदिवासींत राहून काम केले.

त्यांचा २०१३ मधील पश्चिम घाटासंदर्भात महत्त्वपूर्ण अहवाल आहे. राजकीय व आर्थिक लाभामुळे विशेषतः केरळ, महाराष्ट्र व इतर ठिकाणी बेकायदा दगडखाणीमुळे डोंगराखालील गावांचे प्रचंड नुकसान होते.

त्यांच्या या महत्त्वपूर्ण अहवालाची सरकारने गांभीर्याने, स्वार्थरहित अंमलबजावणी व्हावी हीच अपेक्षा आणि डॉ. माधव गाडगीळांचे अभिनंदन!

वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षर धन
संकलन : "मुसाफिर"–९८२२०२०६९१



## निलदास चव्हाण यांचे अल्प आजाराने निधन



नगर – येथील निलदास नन्नु चव्हाण (वय ७२, रा.सर्जेपूरा एस.टी. कॉलनी, मंगलगेट) यांचे २१ डिसेंबर रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पत्नी, २ मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. भारतीय जनता पार्टी अनुसूचीत मोर्चाचे जिल्हाध्यक्ष नरेश चव्हाण यांचे ते वडील होत.

## निलेश मोहिते यांचे हृदयविकाराने निधन



नगर – येथील निलेश चंद्रकांत मोहिते (वय ३५, रा.सिद्धार्थनगर) यांचे २१ डिसेंबर रोजी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे आई, वडील, पत्नी, १ मुलगा, १ मुलगी, ४ भाऊ, भावजया, २ चुलते असा परिवार आहे. पैलवान अंकुश मोहिते यांचे ते बंधू होत.

## चंद्रभागाबाई विधाटे यांचे अल्प आजाराने निधन



नगर – येथील रहिवासी चंद्रभागाबाई विधाटे (रा.घोडेगाव, ता.नेवासा) यांचे २२ डिसेंबर रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर २३ डिसेंबर रोजी घोडेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे ३ मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. शरद, अरुण, सुभाष विधाटे यांच्या त्या मातोश्री होत.


## स्मितताई देशपांडे यांचे अल्प आजाराने निधन



नगर – येथील स्मितताई गुरुप्रसाद देशपांडे (वय ५०, रा.नाशिक) यांचे २३ डिसेंबर रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर नाशिक येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्या नेवासा प्रेस क्लबचे संस्थापक गुरुप्रसाद देशपांडे यांच्या पत्नी होत. त्या ज्येष्ठ पत्रकार मधुकर देशपांडे यांच्या स्नुषा होत. त्यांच्या मागे पती, २ मुली, १ मुलगा, सासु, सासरे असा परिवार आहे.


## लक्ष्मण वाडेकर यांचे अल्प आजाराने निधन



नगर – येथील लक्ष्मण गणपत वाडेकर (वय ७६, रा.चिचोंडी पाटील) यांचे २२ डिसेंबर रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर चिचोंडी पाटील अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पत्नी, ५ भाऊ, २ बहिणी, १ मुलगा, सुन, ४ मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे. संतोष वाडेकर यांचे ते वडील होत.

## मुख्याध्यापक दत्तात्रय शिर्के यांचे आजाराने निधन



नगर – अहिल्यानगर जिल्हा परिषदेचे माझी मुख्याध्यापक, प्राथमिक शिक्षक व निंबवी, ता. श्रीगोंदा येथील रहिवाशी दत्तात्रय पांडुरंग शिर्के (वय ७८) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, मुलगी, सून, जावई, नातवंडे, भाऊ, बहिणी, पुतणे असा परिवार आहे. त्यांनी एरंडोली, सारोळा सोमवंशी, विसापूर जेल, येळपणे अशा विविध ठिकाणी ३४ वर्ष ज्ञानदानाचे काम करून अनेक विद्यार्थी घडवले आहेत. ते जुन्या पिढीतील आदर्श शिक्षक व शेतकरी म्हणून परिचित होते. सावित्रीबाई फुले महाविद्यालय पिंपळगाव पिसा येथील प्रा. डॉ. रविंद्र शिर्के व गुणवंत शिक्षिका सौ. वैशाली शितोळे यांचे वडील तर मुख्याध्यापक भाऊसाहेब शितोळे यांचे सासरे होत.

## चंद्रकांत म्हस्के यांचे हृदयविकाराने निधन



श्रीरामपूर – येथील ए.डी.सी.सी.बँकेचे सेवानिवृत्त शाखाप्रमुख चंद्रकांत विश्वासराव म्हस्के (वय ६८) यांचे हृदयविकाराने निधन झाले.

त्यांच्या पश्चात पत्नी, एक भाऊ, दोन मुले, पुतणे, नातवंडे असा परिवार आहे. सुमंतराव म्हस्के यांचे धाकटे बंधू, इंजि.अनिकेत म्हस्के व इंजि. संकेत म्हस्के यांचे वडील, राहुल अशोक म्हस्के यांचे चुलते होत.

## बांधकाम व्यावसायिक योगेंद्र मोरे यांचे अपघाती निधन



श्रीरामपूर – येथील बांधकाम व्यावसायिक योगेंद्र चांगदेव मोरे (वय २६) यांचे पहाटे २ वा. लोणी, ता.राहाता येथे अपघाती निधन झाले. त्यांच्या पश्चात आई, वडील, चुलते, एक भाऊ, एक बहीण असा परिवार आहे. सेवानिवृत्त पोलीस सब इन्स्पेक्टर चांगदेव बाबुराव मोरे यांचे धाकटे चिरंजीव, पुणतांबा येथील जयवंत मोरे व प्रताप मोरे यांचे पुतणे, चेतन मोरे यांचे बंधू होत.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याची विटंबना होण्याचा धोका, पुतळ्याभोवती बॅरीकेट लावा, परभणीसारखी परिस्थिती उद्‌भवू नये

### महानगरपालिका प्रशासनाने दखल घ्यावी अन्यथा तीव्र आंदोलन करणार

नगर – मार्केटयार्ड चौकातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्या जवळून अवजड वाहन गेल्याने लावण्यात आलेले पेव्हिंग ब्लॉक खचले असून, एखाद्या वाहनाचा धक्का लागून बाबासाहेबांच्या पुतळ्याची विटंबना होण्याचा धोका निर्माण झाला आहे. अशा परिस्थितीमध्ये महापालिका प्रशासनाने बाबासाहेबांच्या पुतळ्या शेजारी बॅरीकेट लावण्याची मागणी वंचित बहुजन आघाडीच्या वतीने करण्यात आली आहे.

मार्केटयार्ड चौकात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे काम प्रगतीपथावर आहे. हे काम सुरु असताना जुना अर्धाकृती पुतळ्या त्याच जागेवर असून, त्या भोवताली असलेला संरक्षक भिंती व कठडे हटविण्यात आले आहे. तर पुतळ्या शेजारी पेव्हिंग ब्लॉक बसविण्यात आले आहे. मात्र त्या पेव्हिंग ब्लॉकच्या रस्त्यावरुन रात्री वाहने जात असल्याने लावण्यात आलेले पेव्हिंग ब्लॉक देखील खचले आहे. या पार्श्वभूमीवर शिष्टमंडळाने पुतळा परिसराची पहाणी केली. यावेळी जिल्हाध्यक्ष योगेश साठे, सल्लागार जे.डी. शिरसाठ, शहर महासचिव अमर निरभवणे, नगर तालुकाध्यक्ष मारुती पाटोळे, संजय शिंदे, जीवन कांबळे, प्रमोद सूर्यवंशी आदी उपस्थित होते.

योगेश साठे म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्या भोवती बॅरीकेट नसल्याने एखादे वाहन पुतळ्यास धडकण्याची शक्यता नाकारता येत नाही. पुतळ्या शेजारुन वाहने जात असून, सुदैवाने वाहनांचा धक्का अद्यापि पुतळ्यास लागलेला नाही. तर काही समाजकंटक देखील ही दुर्घटना जाणीवपूर्वक करण्याच्या तयारीत असतील.

परभणी येथे नुकतेच बाबासाहेबांच्या पुतळ्या जवळील संविधानाची तोडफोड करुन विटंबना झाली आहे. अशी गंभीर परिस्थिती शहरात उद्‌भवू नये म्हणून महापालिका प्रशासनाने तात्काळ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्या भोवती बॅरीकेट लावण्याची मागणी त्यांनी केली. तातडीने महापालिका प्रशासनाने सदर प्रश्नी दखल घ्यावी अन्यथा आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.



मार्केटयार्ड चौकातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्या जवळून अवजड वाहन गेल्याने लावण्यात आलेले पेव्हिंग ब्लॉक खचले असून, त्याची पाहणी करताना वंचित बहुजन आघाडीचे पदाधिकारी.



## पतसंस्थांमधील ठेवी परत मिळण्यासाठी ठेवीदारांचे उपोषण

पारनेर तालुक्यातील सेनापती बापट मल्टीस्टेट संस्था व गोरेश्वर ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्या गोरेगांव या दोन्ही संस्थांमध्ये ठेवीदारांच्या ठेवी अडकल्या आहेत. ठेवींचे पैसे परत देण्यास टाळाटाळ केली जात आहे. त्यामुळे संस्थांचे संचालक मंडळ व व्यवस्थापक यांच्यावर गुन्हे दाखल करण्याच्या मागणीसाठी भ्रष्टाचार विरोधी लोकआंदोलनचे अरुण आंधळे पाटील यांच्या नेतृत्वाखाली राजेंद्र औटी, निलेश गाडगे, चंद्रकांत पाचारणे, रामचंद्र गाडगे यांच्या सह ठेवीदारांनी जिल्हा उपनिबंधक कार्यालयासमोर सोमवारी (दि.२३) सकाळ पासून बेमुदत आमरण उपोषण सुरु केले आहे. यात सहभागी झालेले ठेवीदार.(छाया – लहू दळवी)

# खासगी बसमधून प्रवास करणाऱ्या प्रवाशांच्या बॅग दागिन्यांची चोरी

### नगर – पुणे रोडवरील हॉटेल समोरील घटना, अज्ञात चोरट्यावर गुन्हा दाखल

नगर – खासगी बस मधून प्रवास करणार्या प्रवाशांच्या बॅग मधील १ लाख ५२ हजार रूपये किंमतीचे सुमारे ७ तोळ्याचे सोन्याचे दागिने चोरट्यांनी लांबविले. सदरची घटना शनिवारी (दि.२१) सकाळी आठ ते सव्वा आठच्या दरम्यान कामरगाव (ता. नगर) शिवारातील हॉटेल गुरूदेव जवळ घडली. या प्रकरणी सायंकाळी नगर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत प्रिया नीतेश जयस्वाल (वय ३३, रा. काळेवाडी, पिंपरी चिंचवड, पुणे) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी व अन्य प्रवाशी एका खासगी बसमधून पुणे येथे जात असताना बस कामरगाव शिवारात हॉटेल गुरूदेव जवळ थांबली होती. फिर्यादी व इतर प्रवाशी बस मधून खाली उतरताच त्यांच्या बॅग मधील सोन्याचे दागिने अज्ञात चोरट्यांने लांबविले. त्यामध्ये फिर्यादीच्या बॅग मधील चार तोळ्याचे मनी मंगळसूत्र, एक तोळ्याचे सोन्याचे वेल, एक तोळ्याची अंगठी, अर्धा तोळ्याची अंगठी, तीन ग्रॅमची अंगठी तसेच महेंद्र प्रताप सिंग यांच्या बॅंगमधील एक तोळ्याचे सोन्याचे दागिने लंपास केले.

सदरचा प्रकार लक्षात आल्यानंतर फिर्यादी व महेंद्र प्रतापसिंग यांनी पुढील प्रवास रद्द करून नगर तालुका पोलीस ठाणे गाठले. सदरची घटना पोलिसांना सांगितली. पोलिसांनी चोरीच्या गुन्ह्याची नोंद केली आहे. अधिक तपास पोलीस अंमलदार जगदीश जंबे करत आहेत.

## चाणक्य चौकातून बुलेटची चोरी

नगर – इमारती समोर रस्त्याच्या कडेला हॅण्डेल लॉक करून लावलेली रॉयल इन्फिल्ड कंपनीची बुलेट (क्र. एम एच १६ बी क्यू २७७२) कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोरून नेली. याप्रकरणी कोतवाली पोलिसांनी रुपेश रतीलाल कटारिया (वय ४४, रा.५६ भोग हॉटेल बिल्डिंग प्लॉट नंबर ४, पुष्पा आर्केड, चाणक्य चौक) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३०३ (ब) प्रमाणे चोरीच्या गुन्ह्याची नोंद केली आहे.

# नगर शहरात १ लाख २० हजारांचा नायलॉन मांजा जप्त

### स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई, विक्रेत्याविरूध्द गुन्हा दाखल

नगर – रेल्वे स्टेशनकडे जाणाऱ्या रस्त्यावरील लोखंडी पुलाजवळील एका गाळ्यातून स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने १ लाख २० हजार रुपये किंमतीच्या नायलॉन चायना मांजाच्या २४० रिळ जप्त केल्या आहेत. रविवारी पोलिसांनी ही कारवाई केली. या प्रकरणी दर्शन दिनेश परदेशी (वय २६, रा. सातभाई गल्ली, अहिल्यानगर) याच्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नगर शहरात सर्रास नायलॉन चायना मांजाची विक्री होत आहे. गुन्हे शाखेच्या पोलिसांसह तोफखाना, कोतवाली, भिंगार कॅम्प पोलिसांकडून विक्रेत्यांवर कारवाई केली जात आहे. पोलीस निरीक्षक दिनेश आहेर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अंमलदार संदीप पवार, विश्वास बेरड, पंकज व्यवहारे, संदीप दरंदले, रवींद्र घुंगासे, उमाकांत गावडे यांचे पथक अहिल्यानगर शहरात नायलॉन चायना मांजाच्या विक्री बाबत माहिती काढत असताना त्यांना माहिती मिळाली की, रेल्वे स्टेशनकडे जाणाऱ्या रस्त्यावरील लोखंडी पुलाजवळ एका पत्र्याच्या गाळ्यात मांजाची विक्री होत आहे. पथकाने सदर ठिकाणी जावून खात्री केली असता दर्शन परदेशी हा नायलॉन चायना मांजा विक्री करत असताना मिळून आला.

त्याच्या ताब्यातून १ लाख २० हजार रुपये किंमतीच्या २४० रिळ जप्त करण्यात आल्या आहेत. त्याच्याविरूध्द कोतवाली पोलीस ठाण्यात बीएनएस २०२३ चे कलम २२३, १२५ सह पर्यावरण संरक्षण अधिनियम कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दरम्यान, शासनाने बंदी घातलेला बेकायदेशीर नायलॉन चायना मांजाची विक्रेत्यांनी विक्री व साठवणूक करू नये, बंदी असलेला मांजा विक्री करताना आढळून आल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल, नागरिकांनी देखील मांजा खरेदी करू नये, असे आवाहन पोलीस अधीक्षक राकेश ओला यांनी केले आहे.



नगर शहरात नायलॉन मांजाचा मोठा साठा पकडल्यानंतर आरोपी व मुद्देमालासमवेत स्थानिक गुन्हे शाखेचे पथक.

# मोबाईल विकण्यास नकार दिल्याने लाकडी दांडक्याने बेदम मारहाण

नगर – मित्रास मोबाईल विकून देण्यास नकार दिल्याचा राग आल्याने मित्रानेच लाकडी दांडक्याने बेदम मारहाण केल्याची घटना स्टेशन रोडवरील क्लेरा ब्रूस शाळेच्या मैदानावर रविवारी (दि.२२ ) सायंकाळी सहा वाजताच्या सुमारास घडली.

याबाबतची माहिती अशी की आकाश सुनील सूर्यवंशी (वय ३२, रा. कोठी रोड अ.नगर) हा क्रिकेट पाहण्याकरिता क्लेरा ब्रूस हायस्कूलच्या मैदानावर गेला असता, तेथे त्याच्या ओळखीचा उदय संतोष गाडेकर (रा. लोंढे मळा, केडगाव ) हा आला व म्हणाला मला पैशाची गरज आहे, माझा मोबाईल विकून दे. तेव्हा आकाश याने मोबाईल विकून देण्यास नकार दिला. याचा राग येऊन उदय तिथून निघून गेला व काही वेळाने त्या ठिकाणी हातात एक लाकडी दांडके घेऊन आला व काही न बोलता त्याने त्याच्या हातातील लाकडे दांडक्याने आकाशाच्या उजव्या पायावर मारहाण केली. आकाश याने तू मला का मारतोस असे विचारले असता उदय याने काही न बोलता मारहाण केली. त्यावेळी विशाल झेंडे हा तेथे आला व त्यांनी आकाशची मारहाणीतून सोडवणूक करून त्यास उपचाराकरीता रुग्णालयात दाखल केले.

याप्रकरणी कोतवाली पोलिसांनी आकाश सूर्यवंशी यांनी दिलेल्या फिर्यादीवरून उदय गाडेकर यांच्याविरुद्ध मारहाणीच्या गुन्ह्याची नोंद केली.

# माळीवाडा येथील दारू अड्‌ड्यावर पोलिसांचा छापा

### २६ हजारांची गावठी दारू जप्त, एकावर गुन्हा दाखल

नगर – विनापरवाना बेकायदेशीर रित्या गावठी हातभट्टी दारूची विक्री करणाऱ्या ठिकाणी कोतवाली पोलिसांनी छापा टाकला. या कारवाईत २६ हजार रुपये किमतीची गावठी हातभट्टीची दारू जप्त करून एकास ताब्यात घेतले. ही कारवाई माळीवाडा येथील शिवम टॉकीज जवळ रविवारी (दि.२२) सायंकाळी साडेसात वाजण्याचे सुमारास केली.

कोतवाली पोलिसांना अशी माहिती मिळाली की, प्रवीण सिरसुल हा माळीवाडा येथे शिवम टॉकीज शेजारी पत्र्याचे शेडचे आडोशाला गावठी हातभट्टी दारुची विक्री करीत आहे. अशी माहिती मिळाल्याने कोतवाली पोलिसांनी तत्काळ त्या ठिकाणी जावून छापा टाकत प्रवीण किसनराव सिरसुल,(वय ५०, रा. काळभैरवनाथ मंदीराजवळ, भराड गल्ली) यास दारू विक्री करताना पकडले.

पोलिसांनी शेडची झडती घेतली असता तेथे २६ हजार रुपये किमतीची सहा ड्रम मध्ये भरलेली २४० लीटर व एक ड्रम निम्मा भरलेला त्यात साधारण २० लीटर अशी एकुण २७० लीटर गावठी हातभट्टी दारु मिळून आली. पोलिसांनी ती जप्त केली.

याप्रकरणी पो.कॉ.सुरज कदम यांनी दिलेल्या फिर्यादीवरून प्रवीण सिरसुल यांच्याविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम १९४९ चे कलम ६५ (ई) अन्वये गुन्हा दाखल केला आहे. ही कारवाई पोलीस अंमलदार संदिप पितळे, दिपक रोहोकले, तानाजी पवार, सचिन लोळगे, सुजय हिंवाळे, सुरज कदम यांनी केली.

# शहरातील पतंग व मांजा विक्रेत्यांना मनपा नोटिसा

### २५ हजारांचा होणार दंड : आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे

नगर – शहरातील पतंग व मांजा विक्रेत्यांना अहिल्यानगर महानगरपालिका प्रशासनाच्या वतीने नायलॉन मांजा विक्री न करण्याबाबत, कायद्याचे पालन करण्याबाबत प्रतिबंधात्मक नोटिसा बजावण्यात आल्या आहेत. तोफखाना, बागडपट्टी यासह शहरातील ज्या ज्या ठिकाणी पतंग व मांजा विक्री होते, तेथे नोटिसा बजावण्यात आल्या आहेत. नायलॉन मांजा विक्री करताना आढळल्यास फौजदारी गुन्हा दाखल करून २५ हजारांचा दंड आकारण्यात येणार असल्याची माहिती आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी दिली.

मकरसंक्रांतीचा सण जवळ आला आहे. या दिवशी व त्याच्या लगतच्या दिवसात पतंग शौकिनांकडून मोठ्या प्रमाणात पतंगबाजी केली जाते. काटाकाटीच्या स्पर्धेत अव्वल ठरण्यासाठी काही जण नागरीक व पशूपक्ष्यांसाठी धोकादायक असलेल्या नायलॉन मांजाचा सर्रास वापर करतात. या मांजाच्या वापरामुळे अनेक जण जखमी झाले आहेत. अनेक पशुपक्षी मृत्युमुखी पडलेत. दरवर्षी कमी अधिक प्रमाणात या घटना घडत असतात. त्यामुळे आपल्या राज्यात या नायलॉन मांजाचा वापर प्रतिबंधित आहे. नागरिकांनी या नायलॉन मांजाचा वापर करू नये, असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी केले आहे.

तसेच, अहिल्यानगर महानगरपालिका क्षेत्रात पतंग व मांजा विक्री करणाऱ्या विक्रेत्यांनीही सामाजिक भान राखावे. बंदी असलेल्या नायलॉन मांजाची विक्री करू नये. या मांजाची विक्री करताना, बाळगताना आढळल्यास त्यांच्यावर फौजदारी कारवाई केली जाईल. तसेच, महानगरपालिकेच्या वतीने संबंधित विक्रेत्यांवर, मांजा बाळगणाऱ्यास २५ हजार रुपये दंड आकारण्यात येईल, असा इशारा आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी दिला आहे. जानेवारी अखेरपर्यंत महानगरपालिकेकडून तपासणी व कारवाई सुरू राहणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

सेल्फ ॲडेसिव्ह पी व्हि सी वॉल टाईल्स, सेल्फ ॲडेसिव्ह वॉलपेपर, किचन वॉलपेपर, रोमन ब्लॉईंड्स,रोलर ब्लॉईड्स, झेब्रा ब्लॉईड्स, व्हर्टिकल ब्लॉईड्स, उडन ब्लॉईड्स, कस्टमाईज ब्लॉईड्स,चीक् ब्लॉईड्स तयार कर्टन्स, कर्टन क्लॉथ,कर्टन रॉड व फिटींग, मच्छर जाळी, आर्टि.वॉल ग्रास, धुळी पासुन संरक्षणासाठी प्लास्टीक तयार पडदे
गुलाबचंद कारपेटवाला
खिस्तगल्ली, जुना कापड बाजार मागे, अहमदनगर.
मो. ९४२२३३९४६०,९४२२३३९४४२,९४२२४५४००५

# गृहिणी

## आरोग्य

### वजन कमी करण्यासाठी

नारळाच्या तेलामध्ये असलेले मिडीयम चेन फॅटी ॲसिड शरीरातील कॅलरीज बर्न करण्यास आणि वजन कमी करण्यास मदत करतात. नारळाच्या तेलामध्ये असलेले एमसीटी शरीरातील चयापचय वाढवतात. याचा अर्थ तुमचे शरीर अधिक कॅलरीज बर्न करेल आणि वजन कमी करण्यास मदत करेल. खोबरेल तेल भूक कमी करण्यास मदत करते. एमसीटी त्वरीत परिपूर्णतेची भावना देतात, ज्यामुळे आपण कमी खातो आणि वजन कमी करतो.

## पाककला

### खजुराचा हलवा

**साहित्य :** एक कप खजूर, दीड कप दूध, चार कप तूप, १/४ कप काजू किंवा बदाम, १/४ कप साखर, १/२ चमचा वेलची पूड

**कृती :** सर्वात आधी एका कढईमध्ये तूप गरम करावे. तसेच त्यामध्ये काजू बदाम भाजून घ्यावे. आता हे काजू बदाम एका प्लेटमध्ये काढून त्याच कढईमध्ये खजूर घालावे व दूध घालावे आता हे मिश्रण शिजू द्यावे जोपर्यंत खजूर मऊ होत नाही तोपर्यंत शिजू द्यावे. हे मिश्रण घट्ट झाल्यानंतर त्यामध्ये साखर आणि वेलची पूड घालावी. व परतवून घ्यावे. तसेच आता हा हलवा एका प्लेटमध्ये काढून त्यावर तुपात भाजलेले काजू बदाम पेरावे.

## वास्तू

### मनी प्लांट संबंधी

बहुतेक लोक त्यांच्या घरात मनी प्लांट लावतात कारण असे मानले जाते की ते पैसे आकर्षित करते. मनी प्लांटला जास्त पाणी दिल्याने त्याची मुळे कुजतात आणि त्यावर बुरशीची वाढ होते. मनी प्लांट ही शुक्राची वनस्पती आहे असे म्हणतात, त्यामुळे मंगळ, चंद्र आणि सूर्य यांच्या वनस्पतीप्रमाणे. शुक्राच्या शत्रू ग्रहांची रोपे जवळ लावू नयेत.

## सल्ला

एखाद्या ठिकाणी जर आपली ओरिजनल डॉक्युमेन्टस् न्यायचे असतील तर त्यांच्या झेरॉक्स प्रती काढून ठेवा तसेच फोटो काढून ठेवा व नंतर ओरिजनल डॉक्युमेंट त्याच्याशी तपासा म्हणजे गहाळ झालेले नाही हे समजेल.

## सौंदर्य

दूध आणि मध एकत्र करून त्वचेवर चोळल्याने ती मऊ व उजळ होते.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

मंगळवार, दि. २४ डिसेंबर २०२४

**---, शके १९४६ क्रोधीनामसंवत्सर, मार्गशीर्ष कृष्णपक्ष, हस्त १२|१७, सूर्योदय ०६ वा. ३२ मि. सूर्यास्त ०६ वा. १७ मि.**

### राशिभविष्य

**मेष** : नवीन मित्रांच्या ओळखी होतील. भविष्यात त्यांचा उपयोग होईल.

**वृषभ** : आपल्या सहकार्यांबरोबर झालेल्या मतभेदांचे निराकरण करण्याचा प्रयत्न कराल. अधिकार क्षेत्रात वाढ होईल.

**मिथुन** : मोठ्यांचा सहवास लाभेल, त्यांना भेटून आनंद होईल. दूर किंवा विदेशात असलेल्या संततीच्या शुभवार्ता मिळतील.

**कर्क** : विशेषतः धंदा-व्यवसाय करणाऱ्यांना आज फारच लाभदायक दिवस आहे. मित्राच्या भेटीतून आनंद मिळेल.

**सिंह** : भेटीचे योग येतील. अचानक धनलाभ संभवतो. प्रवास होतील. काम करायला उत्साह वाटणार नाही.

**कन्या** : रागावर आज संयम ठेवल्याने यश मिळेल. खर्च अधिक होईल.

**तूळ** : आज नवीन कामे सुरू कराल. नवीन परिचय लाभदायक ठरतील.

**वृश्चिक** : शारीरिक व मानसिक स्वास्थ्य लाभेल. आर्थिक लाभ होईल.

**धनु** : प्रतिस्पर्ध्यांवर विजय मिळवाल. चर्चा-वादविवाद यातही तुमचा प्रभाव राहील. कष्टाच्या मानाने यश संतोषजनक नसेल.

**मकर** : हा वेळ आपल्या एखाद्या आवडीच्या व्यक्तीबरोबर घालवाल.

**कुंभ** : आपल्या जुन्या लोकांना किंवा आधार देणाऱ्या मित्रांना जोडणे यावेळी आपल्यासाठी फलदायी आहे.

**मीन** : राजकीय विषयांमध्ये स्थिती सुखद राहील. सांसारिक किंवा इतर प्रश्नांमुळे मन उदास राहील.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## हसा आणि शतायुषी व्हा!

**राम** : माझे घड्याळ दहा वर्षापूर्वी नदीत पडले व आता सापडले. तरी ते चालू होते.

**शाम** : हे तर काहीच नाही. माझे वडील दहा वर्षांपूर्वी नदीत बुडाले व आता वर आले तरी ते जिवंतच आहेत.


# जागतिक आश्चर्ये

## बुद्धाचे स्मृतीस्थळ - बागन पॅगोडा

*तीन महत्त्वाचे बागन पॅगोडा म्हणजेच सी बीन्यू आनंदा आणि सेझीगॉन पॅगोडा अशी गणली जातात. यी बीन्यू हा सर्वात उंच असा पॅगोडा आहे. त्यापेक्षा उंचीने थोडा कमी असलेला आनंदा पॅगोडा सर्वात जास्त प्राचीन पॅगोडा आहे व तो अतिशय काळजीपूर्वक जतन केला गेला आहे. सेझीगॉन पॅगोडा हा अत्यंत पवित्र असा मानला जातो. उपड्या घंटीच्या आकाराचा स्तूप बांधलेला आहे व तो बुद्धाच्या स्तृतीसाठी बांधण्यात आला आहे.*

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## शब्दगंध क्र. ७०७७ सौ.शैलजा कुलकर्णी



**आडवे शब्द :** १) प्रपंच; भव ४) वंदन करण्यासाठी वापरला जाणारा एक शब्द ७) राजा हरिश्चंद्राची पत्नी ९) एका हाताची ओंजळ १०) तारुण्याचा पूर्व भाग १३) भुईमूग, करडई, तीळ, कारळ वगैरे धान्यांतून निघणारा स्निग्ध पदार्थ १५) विष्णूचे एक नाव १७) तेज; सामर्थ्य; पराक्रम; ऐश्वर्य १८) बगीचा; उद्यान; उपवन १९) अस्थिर; दोलायमान २१) मासा; बारा राशींपैकी एक

**उभे शब्द :** १) रागाचा अतिरेक २) पुढे ढकलणे; बरेवाईट; सरसनीरस ३) एक प्रकारची दारू ५) चिंतन; ध्यान ६) मोठेपणा; थोरवी; महिमा ८) वाताहत; बोजवारा ११) वर्तुळ; कडे १२) तळलेला एक खमंग खाद्यपदार्थ १४) वहिवाट; पद्धत; धर्मपंथ; चाल १५) हिचे मीठ आळणी असते असे म्हणतात १६) भडकलेला अग्नी १८) वार्ता; वृत्त; समाचार; खबर २०) धुंद; ताठलेला

### शब्दगंध क्र. ७०७६ चे उत्तर



# मुलांचे विश्व

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** : या संसारात ईश्वराचे भय इतर सर्व भयांपासून मनुष्याला मुक्त करीत असते.

## मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

### बाळाला फॅरेक्स, सेरेलॅक वगैरे द्यावे का?

बाळाला तीन महिन्यांपर्यंत आईच्या दुधाखेरीज दुसरे काहीही द्यायची खरे तर गरज नाही. त्यानंतर हळूहळू भाताचे पाणी, डाळीवरचे पाणी, फळांचे रस द्यायला सुरुवात करावी. मग खीर, कुस्करलेला बटाटा, केळे असे पदार्थ द्यावेत. नंतर पोळी, भात द्यावा. नैसर्गिकतः आढळणारे पदार्थ व जे पदार्थ घरात वारंवार तयार केले जातात, ते खाण्याची मुलाला सवय व्हायला हवी.

फॅरेक्स, सेरेलॅक यामध्ये वर उल्लेखलेल्या पदार्थातील मूलभूत घटकच असतात व वर जाहिरात म्हणून जीवनसत्त्वे, क्षार इत्यादी असतात. मुलाचा आहार त्यातून मिळवायचा असेल, तर चार दिवसाला एक ते दीड डबा फॅरेक्स वा सेरेलॅक त्याला द्यावे लागेल. या डब्यांची किंमत पाहता सर्वसामान्य माणसाला ते परवडणे अशक्यच आहे आणि परवडले तरी जे पदार्थ आपण ताजे बनवून मुलाला देऊ शकतो, ते पदार्थ वेगळ्या स्वरूपात डब्यात साठवून मुलांना का द्यायचे? आपण खातो त्या पदार्थांत जीवनसत्त्वे, क्षार पुरेशा प्रमाणात असतात. त्याचा वेगळा पुरवठा करण्याची सामान्यपणे गरज नसते. फॅरेक्स वगैरे पाण्यात व दुधात मिसळून देतात, त्यामुळे मुलाला चावावे लागत नाही. साहजिकच जबड्याचे स्नायू पुरेसे विकसित होत नाहीत.


या सर्व कारणांमुळे असे म्हणता येईल की, फॅरेक्स, सेरेलॅक यांसारख्या पदार्थांपासून बाळाला वाचवावे. त्याला आपण नेहमी खातो त्याच वस्तू खायला द्याव्यात, म्हणजे तो त्या पदार्थांना रुळेल व पहिल्या वाढदिवसापर्यंत सर्वच पदार्थ खायला लागेल. त्याची तब्येतही चांगली होईल.

## अविचार

एका शेतकऱ्याने आपल्या मळ्यात भाजीपाला, फळे आणि ज्वारीही केली होती. पिकं तयार झाल्यावर कोल्ह्यांनी पिकांची नासाडी करीत धुमाकूळ घातल्याने शेतकऱ्याला फार राग आला. कोल्ह्यांना पकडण्यासाठी त्याने एके ठिकाणी चाप लावला. एका चापात एक कोल्हा बरोबर अडकला. सकाळी चापात अडकलेला कोल्हा पाहताच शेतकऱ्याचा संताप अनावर झाला. कोल्ह्याला चांगलीच अद्दल घडवावी, या हेतूने त्याने तेलाने भिजवलेली चिंधी कोल्ह्याच्या शेपटाला बांधून ती पेटवून दिली. आगीने होरपळलेला कोल्हा सैरावैरा धावत ज्वारीच्या पिकात शिरला. ज्वारी वाळून कापणीला आली होती. तिने पेट घेतला. थोड्याच वेळात ज्वारीचे संपूर्ण शेत जळून खाक झाले. हे पाहून शेतकऱ्याने कपाळावर मारुन घेतले. 'कोल्ह्याचा सूड घेण्यासाठी संतापाच्या भरात मी माझेच नुकसान करुन घेतले', असे म्हणत तोही पश्चात्तापाने होरपळू लागला.

**तात्पर्य** : अविचाराने केलेले कृत्य नाशास कारणीभूत ठरते.

# रहमते दर्शन (भाग - १)



एक बार मैं घर पर सोया था, रात के डेढ़ बजे जो कुछ भी होता है, सत्गुरु की मर्ज़ी से होता है और वही ठीक भी होता है।थे कि तेजी से विस्फोट हुआ। मैंने घबरा कर चीख के साथ महाराज कृपालसिंह जी एवं महाराज दर्शनसिंह जी को पुकारा तो दोनों महापुरुष दिखाई दिये। मेरे दिल में ख़्याल आया कि अब आश्रम में सत्संग कौन करेगा? कृपालसिंह जी महाराज बोले, बेटे, अब ये दर्शनसिंह जी नहीं करेंगे, अब कोई और करेगा। मैंने उसी वक्त अपनी पत्नी को, जो कुछ मेरे साथ हुआ, बतला दिया। वो कहने लगी कि ये बात किसी को न कहना, नहीं तो लोग तरह-तरह की बातें बनाएँगे। जब मैं मंगलवार ३० मई को कृपाल आश्रम आया, तो मुझे पता चला कि महाराज जी की तबीयत ठीक नहीं है। आश्रम में सन्नाटा छाया हुआ था। उसके कुछ देर बाद अन्दर कोठी से एक स्त्री रोती हुई बाहर आयी और बोली कि महाराज जी ने शरीर छोड़ दिया है। ये उस महापुरुष की सत्य कथा है जो मेरे साथ हुई है। वो सचमुच पूर्ण महापुरुष थे।

### सच्चे सहाय्यक

दयाल पुरुष संत दर्शनसिंह जी महाराज की शरण में आने का सौभाग्य मुझे १९७८ में प्राप्त हुआ। मैं एक बार अपनी बड़ी साली के घर कुछ दिन रहने के लिए गया, तो उन्होंने महाराज कृपालसिंह जी की दया-मेहर के बारे में इतना कुछ कहा कि मैं प्रभावित हुए बिना न रह सका। मैं वापिस दिल्ली आकर कृपाल आश्रम में महाराज दर्शनसिंह जी के दर्शन करने लगा और सत्संग सुनने लगा। महाराज दर्शनसिंह जी के सत्संगों से मैं बहुत प्रभावित हुआ और १ अक्टूबर १९७८ को नामदान की अमूल्य दात महाराज जी से प्राप्त की। इसके बाद मेरी पदोन्नति हो गई और मैं दिल्ली से पटना चला गया। पटना में भी मैं सत्संगों में जाता रहा और समय अच्छा गुज़रता रहा। फिर अचानक मेरी बड़ी लड़की, जो उस समय पाँच साल की थी, रेलवे इंजन के नीचे आ गई और बुरी तरह ज़ख़्मी हो गई। उसको अमृतसर अस्पताल में दाखिल करवाया गया, जहाँ पर डॉक्टरों ने उसके बचने के बारे में नाउम्मीदी जाहिर की। लेकिन महाराज की दया मेहर से मेरी लड़की बच गई। मेरी लड़की की दुर्घटना के कारण मेरा स्थानांतरण पटना से दिल्ली कर दिया गया। अभी मैं दिल्ली में कुछ महीने रुका ही था कि मेरा तबादला फिर दिल्ली से श्रीनगर कर दिया गया। मैंने मुश्किल से तीन महीने ही श्रीनगर में गुज़ारे थे कि मेरी बदली फिर दिल्ली हो गई जो एक बड़ी आश्चर्यजनक घटना से कम नहीं थी। मेरी बदली इतनी जल्दी हो जायेगी, किसी को यकीन नहीं हो रहा था। यह भी संत दर्शनसिंह जी महाराज की दया - मेहर थी।

संत दर्शनसिंह जी महाराज की दया मेहर की एक और बात मेरी ज़िन्दगी में हमेशा यादगार के रूप में रहेगी। यह दिल्ली के १९८४ के दंगों की बात है, जब श्रीमती इंदिरा गाँधी जी की हत्या हुई थी और दिल्ली में भारी लूटपाट और आगज़नी फैली हुई थी और दिल्ली जल रही थी। उस समय महाराज दर्शनसिंह जी ने कई सत्संगी भाई-बहनों के जान-माल की रक्षा की। हमें मारने के लिए और खसोट लूट करने के लिए कई दंगई हमारे घर घुस आये लेकिन महाराज जी की दया - मेहर से, वे हमारे घर की तलाशी लेकर चले गये और कोई जान या माल का नुकसान नहीं हुआ।

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

# अंतरिक बल (भाग - २)

जब आप सोते हैं तो आप का दिमाग और ज्यादा आक्सीजन लेता है। जब हम गहरी याद नींद सोते हैं तो हमारे दिमाग को आराम मिलता हैं। जब मन आराम में होता है तो सहज ही एकाग्र रहता है। मन में हर समय शांत हूं, शांत हूं और आप भी शांत हो शांत हो, सारा संसार शांत हैं शांत है, रिपीट करते रहो तो एकाग्रता बनीं रहेगी। यही एकाग्रता आप द्वारा चमत्कार कराएगी।

दिमाग की शक्ति और नींद (१)

नींद से दिमाग ऊर्जा से भरपूर हो जाता है। जिन लोगों का सोने और जागने का समय तय नहीं होता उनकी याद करने की शक्ति कमजोर हो जाती है। सब के खाने की और कार्य करने की दिनचर्या अलग अलग होती है इसलिए उनके सोने का समय भी अलग अलग होता है। क्या जब आप सुबह जल्दी सो कर उठते हैं तो दिन भर खुद को थका थका सा महसूस करते हैं। जब आप देर से सो कर उठते हैं तब भी थका थका सा महसूस करते हैं। ये लक्षण बताते हैं कि हमें कम या ज्यादा सोना चाहिए। क्या दोपहर को सोना चाहिए। दोपहर की एक नींद सुबह की दो नींद के बराबर है। यह तब होगा अगर इसे हम अपनी आदत बना लें। जो लोग दोपहर को नींद नहीं लेते, वह अगर कभी कभी सोते हैं तो उन्हें ऐसी नींद से थकावट होती है। इसका कारण यह है कि सोने का चक्र तोड़ रहे हैं। पेपरो के दिनो में जो विद्यार्थी नींद घटा देते हैं तो उनके साथ भी यही समस्या खड़ी हो जाती है। हमारा दिमाग पहली और आखिरी बात को याद रखता है। इसलिए सोने से एक घंटा पहले दिन भर की सारी पढ़ाई रिवाइज करें। सुबह उठते ही एक घंटा तक कोई नया टॉपिक पढ़ें। पहले एक घंटे तक दिमाग तरोताजा रहता है। जैसे जैसे दिन बढ़ता है एनर्जी में कमी आती जाती है। अंत में ऐसे लगता है कि पढ़ी हुई बात अंदर जाने की वजाए बाहर जा रही है। प्रत्येक ५० मिनट के बाद भूलने का क्रम शुरू हो जाता है। यदि कई घंटे तक पढ़ना चाहते हैं तो हरेक ५० मिनट के बाद १० मिनट का रेस्ट लें। रेस्ट के समय आप चाय नाश्ता कर सकते हैं। संगीत सुन सकते हैं। थोड़ा टहल सकते हैं। थोड़ा ध्यान का अभ्यास कर सकते हैं। कोई श्रेष्ठ वाक्य, मैं खुश हूं, चुस्त हूं, शांत हूं, उत्साही हूं, भाग्यशाली हूं, रिपीट कर सकते हैं। किसी की मन से सेवा कर सकते हैं। भगवान को याद कर सकते हैं। इस से नई स्फूर्ति पैदा होगी जो आप को पढ़ने में शक्ति देगी। दिमाग की शक्ति और नींद (२)

### दिमाग की शक्ती

प्रत्येक मनुष्य में एक जैविक घड़ी होती है। यह मास्टर घड़ी हजारों तंत्रिका कोशिकाओं से बनी होती है। यह दिमाग के हाईपोथेलमस हिस्से में मैजूद होती है। हाईपोथेलमस शारीरिक कार्यों के लिए हार्मोन पैदा करता है। हाईपोथेलमस शरीर के तापमान और पानी की मात्रा को भी नियन्त्रित करता है। आंतरिक जैविक घड़ी हर रोज रोशनी के आधार पर दुबारा सेट होती है। एक दिन में २४ घंटे के हिसाब से सभी की घड़ियां एक समान होनी चाहिए। परंतु ऐसा नहीं है। इसी वजह से किसी को जल्दी नींद आती है तो कोई देर तक जागता है। आप की घड़ी तेज है तो सब कुछ जल्दी-जल्दी करेंगे। अगर आप की घड़ी धीमी है तो हरेक काम धीरे-धीरे करेंगे। आंतरिक घड़ी की चाहे जो भी गति हो हमें आपने समाज की बनाई हुई रात ९ से सुबह ५ बजे की रोटीन से तालमेल बिठाना चाहिए। जब हम अपने कमरे की लाईट बंद कर के बिस्तर पर जाते हैं और अपनी आंखे बंद करते हैं तो धीरे-धीरे हमारे दिमाग से अल्फा वेवज निकलती हैं जो हमें नींद की ओर ले जाती हैं। इस अवधि में हमारा मस्तिष्क धीरे धीरे इस दुनिया से अलग हो जाता है। कुछ महत्वपूर्ण चरणों से गुजरने के बाद हमें नींद आ जाती है। नींद द्वारा शरीर के घाव जल्दी भरते हैं, अगर कोई हो तो। रोग प्रतिरोधक सिस्टम की मुरम्मत हो जाती है।

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

# आयुर्वेदिक गर्भसंस्कार

**फायदे :** या प्राणायामामुळे खाल्लेले अन्न घशाशी येणे, जळजळ होणे यांसारखे पित्तवृद्धीचे दोष नष्ट होतात. २) या प्राणायामाच्या नियमित सरावाने गर्भवतीची शारीरिक शक्ती व मनोबल वाढते.

**क) शीतली प्राणायाम: कृती -** 'शीतली' व 'सीत्कारी' प्राणायामामध्ये फारसा फरक नाही. प्रथम पद्मासन किंवा वज्रासन अवस्थेत बसावे. तोंड उघडून जीभ बाहेर काढावी आणि पक्ष्याच्या चोचीप्रमाणे जिभेची नळी करून 'सी...सी...सी' असा आवाज करीत तोंडाने जिभेवरून श्वास आत खेचा. थोडा श्वास रोखून ठेवा व दोन्ही नाकपुड्यांद्वारा संथपणे श्वास बाहेर सोडा.

**वेळ -** साधारणतः ३ ते ५ मिनिटे ही क्रिया करावी.

**फायदा -** श्वसनसंस्थेची कार्यक्षमता वाढते व मनःशांती मिळते.

वरील सर्व प्रकारच्या प्राणायामामुळे गर्भवतीच्या श्वसनसंस्थेची कार्यक्षमता वाढून तिला श्वास रोखून धरण्याची सवय झाल्याने प्रसूतीच्या वेळेला याचा उपयोग होतो.

**ड) कपालभाती प्राणायाम :** 'कपालभाती' हा प्राणायाम गर्भावस्थेमध्ये करू नये.

**गर्भावस्थेमध्ये उपयुक्त योगासने :** दीर्घश्वसन, प्राणायाम झाल्यानंतर योगासने करावीत. सुरुवातीला सूक्ष्मक्रिया (हलके व्यायाम) करावेत. सूक्ष्मक्रियां मुळे शरीरातील रक्ताभिसरण सुधारते. स्नायू मजबूत व लवचीक होतात. योगासने करण्याआधी शरीराची पूर्वस्थिती म्हणजे सूक्ष्मक्रिया होय; त्यामुळे योगासने करताना शरीरामध्ये लचक भरणे, स्नायू जखडणे असे प्रकार होत नाहीत. ज्या गर्भवतींना पूर्णपणे आराम सांगितला आहे, अशा गर्भवती देखील तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली सूक्ष्मक्रिया करू शकतात.

### व्यायामाचे प्रकार

**१) मानेचा व्यायाम :** प्रथमतः सुखासनात किंवा पद्मासनात ताठ बसावे. मान उजवीकडून डावीकडे व परत डावी कडून उजवीकडे पाच वेळा फिरवावी नंतर सर्व बाजूंनी गोलाकार पाचवेळा फिरवावी. मानेचा व्यायाम हा बसूनच करावा, कारण व्यायाम करताना मानेला झटका बसून चक्कर येण्याचा संभव असतो. मानेला झटका न देता सावकाशपणे ही क्रिया करावी.

**२) खांद्याचे व्यायाम :** दोन्ही हातांचे पंजे खांद्यावर ठेवून खांदा पुढून मागे पाचवेळा व मागून पुढे गोलकार फिरवावा; यामुळे मानेचे व फुफ्फुसाचे स्नायू बळकट होतात.

**३) हाताचे व्यायाम :**

हात खांद्यापासून वर उचलून क्रमाक्रमाने एक-एक हात पाच वेळा गोलाकार फिरवावा.

**४) हाताच्या पंजांचे व्यायाम :**

दोन्ही हात छातीच्या समोर ताठ ठेवावेत व पंज्यांची पाच वेळा उघडझाप करावी. त्यानंतर मूठ बंद करून मूठ उजवीकडून डावीकडे व डावीकडून उजवीकडे फिरवावी.

**५) पाठीचा व्यायाम :**

सरळ उभे राहून पायांमध्ये थोडे अंतर घ्यावे. नंतर छातीसमोर दोन्ही हात गुंफावेत. त्यानंतर पाय न हालवता जसे आहेत तसेच ठेवून जेवढे जमेल तेवढे उजवीकडे वळावे, त्याच पद्धतीने प्रथमतः सरळ होऊन डावीकडे वळावे. असे पाच-पाच वेळा दोन्ही बाजूंनी शरीर फिरवावे, त्यामुळे पाठीचे व कमरेचे स्नायू मजबूत व लवचीक होतात. गर्भावस्थेमध्ये जो पाठदुखी व कंबरदुखीचा त्रास होत असतो तो या व्यायामामुळे होत नाही.

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**

दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर अहमदनगर

मोबाईल नं- ८७९३४००४००



नवी दिल्ली येथील नॅशनल कराटे चॅम्पियनशिप स्पर्धेत अहिल्यानगरच्या खेळाडूंनी यश मिळविले.

## नवी दिल्ली येथील नॅशनल कराटे चॅम्पियनशिप २०२४-२५ स्पर्धेत अहिल्यानगरच्या खेळाडूंचे यश

नगर - नुकत्याच झालेल्या १७ व १८ डिसेंबर रोजी तळकटोरा स्टेडियम नवी दिल्ली येथे पार पडली. दिल्ली येथे नॅशनल कराटे स्पर्धेत महाराष्ट्र, दिल्ली, हिमाचल प्रदेश, उत्तरप्रदेश, तमिलनाडु, हरियाणा, बिहार, केरल, पश्चिम बंगाल, गुजरात, झारखंड व इतर राज्यांचा सहभाग होता. या स्पर्धेत महाराष्ट्र राज्य संघामध्ये एस जी स्पोर्ट अ‍ॅकॅडमी अहिल्यानगरच्या ४ खेळाडूंची निवड झाली होती. अहिल्यानगरच्या खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी करून यश प्राप्त केले. त्यामध्ये वरद सचिन कोकरे (कुमीतेमध्ये सुवर्णपदक, कातामध्ये कास्य पदक), आदित्य दादासाहेब बोरुडे (कुमीतेमध्ये रौप्य पदक, कातामध्ये रौप्य पदक) श्रवण रोहित डोंगरे (कुमीतेमध्ये कास्य पदक, कातामध्ये कास्य पदक), दर्शन स्वप्नील विधाते (कुमीतेमध्ये कास्य पदक, कातामध्ये कास्य पदक) या सर्व खेळाडूंनी आपल्या कलेचे प्रदर्शन केले.

ह्या खेळाडूंना एस जी स्पोर्टस् अकॅडमीचे प्रशिक्षक केतन जगताप, प्रशिक्षक पायल पवार, प्रशिक्षक संस्कृती चव्हाण व मुख्य प्रशिक्षक सेन्सैई सूरज गुंजाळ सर यांचे प्रशिक्षण लाभले.

तसेच कराटे असोसिएशन ऑफ महाराष्ट्रचे जनरल सेक्रेटरी शिहान रवींद्र करळे सर व व्हाईस प्रेसिडेंट शिहान सुरेश मिरकर सर व टेक्निकल डायरेक्टर शिहान विनय बोडे सर व सेन्सैई जितू सर यांचे मार्गदर्शन लाभले.

# इतरांच्या जीवनात प्रकाश आणि आनंद निर्माण करण्याचा उत्सव म्हणजे नाताळ

### बिशप दरबारा सिंग यांचे प्रतिपादन; पीस फाउंडेशनतर्फे ग्रामीण भागातील याजकांचा सन्मान व कृतज्ञता व्यक्त करणारा विशेष कार्यक्रम

नगर - नाताळ सण हा केवळ साजरा करण्याचा नाही तर इतरांच्या जीवनात प्रकाश आणि आनंद निर्माण करण्याचा उत्सव आहे. येशू ख्रिस्ताने आपले जीवन समाजाच्या कल्याणासाठी समर्पित केले. देवाचा पुत्र असूनही त्याचा जन्म एका लहानशा गायीच्या गोठ्यात झाला, ज्यातून त्याने नम्रता, त्याग आणि दयाळूपणाचा संदेश दिला. आज आपण त्याच विचारांची आठवण ठेवून इतरांच्या आनंदात सहभागी होणे महत्त्वाचे आहे. नाताळ सण देवाने मनुष्यावर केलेली प्रीती व त्याग याचे प्रतीक मानले जातो. त्यामुळे नाताळ सणाचा खरा अर्थ हा इतरांच्या सेवेमध्ये आहे, असे बिशप दरबारा सिंग यांनी आपल्या मनोगतात सांगितले.





पीस फाउंडेशनच्या वतीने नाताळ सणाचे औचित्य साधून ग्रामीण भागात सेवाकार्य करणाऱ्या याजकांच्या सेवेला सलाम करण्यासाठी खास कृतज्ञता कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

पीस फाउंडेशनच्या वतीने नाताळ सणाचे औचित्य साधून ग्रामीण भागात सेवाकार्य करणाऱ्या याजकांच्या सेवेला सलाम करण्यासाठी खास कृतज्ञता कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाचा उद्देश त्यांच्या सेवेसाठी कृतज्ञता व्यक्त करणे, तसेच त्यांच्या योगदानाची दखल घेऊन त्यांचा सन्मान करणे हा होता.

कार्यक्रमाची सुरुवात प्रार्थनेने झाली. यावेळी विविध चर्चच्या याजकांनी एकत्र येऊन नाताळ सणाचा खरा अर्थ समजून घेतला. प्रमुख अतिथी म्हणून सी.एन.आय. नाशिक धर्मप्रांताचे बिशप राईट रेव्हरंड दरबारा सिंग हे उपस्थित होते. यावेळी बूथ हॉस्पिटलचे प्रशासक देवदान कळकुंभे, रेव्ह.जे.आर.वाघमारे, डॉ.मार्क सोनवणे, सॅम्युअल वाघमारे, डॉ. विजय संसारे यांच्यासह ग्रामीण भागातील याजक उपस्थित होते. बिशप दरबारा सिंग यांच्या हस्ते याजकांना भेटवस्तूंचे वितरण करण्यात आले.

रेव्ह. जे. आर. वाघमारे यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, पीस फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. मार्क सोनवणे यांचे वडील स्वर्गीय रेव्ह. एल.बी. सोनवणे हे देखील एक याजक होते, त्यांनी अनेक वर्ष ग्रामीण भागात सेवाकार्य केले. त्यांनी नेहमीच इतरांची मदत केली. ग्रामीण भागातील नागरिकांना अनेक बाबतीत सहकार्य केले. त्यांचे इतर सहकारी याजकांना सहकार्य असायचे, त्यामुळे त्यांच्या कुटुंबाला त्यांचे अनेक बाबतीत आशीर्वाद मिळाले, स्व. रेव्ह. एल.बी. सोनवणे यांचे हे कार्य डॉ. मार्क सोनवणे पुढे घेऊन जात आहेत, त्यामुळे या भेट वस्तूंचे नियोजन पीस फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. मार्क सोनवणे यांनी स्वखर्चाने केले.

डॉ. मार्क सोनवणे यांनी आपल्या भाषणात सांगितले, ग्रामीण भागातील याजक हे खऱ्या अर्थाने समाजाचे आधारस्तंभ आहेत. ते फक्त अध्यात्मिक मार्गदर्शन करत नाहीत, तर अनेकदा गरजू लोकांना मदत करण्यासाठी पुढे सरसावतात. देवाच्या सेवकांच्या या कार्याची कृतज्ञता व्यक्त करणे हा नाताळ सणाचा खरा आनंद आहे. त्यांच्या सेवेला कृतज्ञतेने सन्मानित करणे हे आमचे कर्तव्य आहे.


डॉ. मार्क सोनवणे यांनी आपल्या वडिलांचे, स्व. रेव्ह. एल.बी. सोनवणे यांचे स्मरण केले. त्यांनी ग्रामीण भागात केलेल्या सेवाकार्याची माहिती देत त्यांच्या समाजसेवेच्या वारशाला पुढे नेण्याचा संकल्प व्यक्त केला.

कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेल्या बूथ हॉस्पिटलचे प्रशासक मेजर देवदान कळकुंभे यांनी पीस फाउंडेशनच्या विविध उपक्रमांचे कौतुक केले. ते म्हणाले, ग्रामीण भागातील याजकांसाठी अशा प्रकारच्या सन्मान कार्यक्रमाचे आयोजन करणे ही कौतुकास्पद बाब आहे. पीस फाउंडेशनने जेष्ठ नागरिक, महिला आणि वंचित घटकांसाठी केलेले काम प्रेरणादायी आहे. या कार्याला बूथ हॉस्पिटलकडून नेहमीच आवश्यक ते सहकार्य करण्यात येईल.

कार्यक्रमात प्रार्थना व संदेशाद्वारे नाताळ सणाचे महत्त्व उलगडण्यात आले. ग्रामीण भागातील याजकांनीही आपल्या अनुभवांचे आणि सेवाकार्याचे विचार कथन केले, ज्यामुळे कार्यक्रम अधिक प्रेरणादायी ठरला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक पीस फाउंडेशनचे सचिव सॅम्युअल वाघमारे यांनी केले. त्यांनी फाउंडेशनच्या कार्याचा आढावा घेत संस्थेच्या विविध उपक्रमांची माहिती दिली. आभार प्रदर्शन डॉ. विजय संसारे यांनी केले.

हा कृतज्ञता कार्यक्रम ग्रामीण भागातील याजकांसाठी एक संस्मरणीय पर्व ठरला. अशा कार्यक्रमांमुळे सामाजिक एकोप्याला आणि समर्पणाला नवी दिशा मिळते, असे मत उपस्थितांनी व्यक्त केले. पीस फाउंडेशनचा हा उपक्रम निश्चितच प्रेरणादायी ठरतो, अशा भावना उपस्थितांनी व्यक्त केल्या.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री झाल्यानंतर पहिल्यांदाच अहिल्यानगर शहरात आल्यानंतर बुऱ्हाणनगर येथे आमदार शिवाजीराव कर्डिले यांच्या निवासस्थानी जाऊन भेट घेतली. यावेळी त्यांचा सत्कार करताना अक्षय कर्डीले, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, विधान परिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, आमदार संग्राम जगताप, माजी आमदार अरुण जगताप, बबनराव पाचपुते, माजी महापौर बाबासाहेब वाकळे, निखिल वारे आदी उपस्थित होते. यावेळी देवेंद्र फडणवीस यांचे औक्षण प्रियंका कर्डिले यांनी केले तर मुख्यमंत्री यांनी शिवाजीराव कर्डिले यांच्या नाती बरोबर खेळण्याचा आनंद घेतला. (छाया - लहू दळवी)



पद्मश्री पोपटराव पवार यांच्या मुलाच्या विवाह प्रसंगी अण्णा हजारे नगरला आले असता त्यांनी सावेडी उपनगर या ठिकाणी माजी नगरसेवक धनंजय जाधव यांच्या निवासस्थानी भेट दिली. (छाया - लहू दळवी)



दादरच्या सदानंद धवन ग्राऊंडमध्ये प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाच्या संयुक्त मुख्य प्रशासिका संतोष दीदी यांच्या उपस्थितीत (२१ डिसेंबर) सकाळी ७.३० ते ८.३० या वेळेत जागतिक ध्यान दिवस साजरा केला गेला. संयुक्त राष्ट्राने २१ डिसेंबर हा पहिला जागतिक ध्यान दिवस म्हणून घोषित केला आहे. प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाच्या १४० देशांमधील ६००० सेवा केंद्रांवर जागतिक ध्यान दिवस साजरा केला गेला. दादरमध्ये आयोजित कार्यक्रमात प्रसिद्ध गायिका अवनी जोशी, अभिनेत्री ईशा अगरवाल तसेच बीके डॉ. दीपक हरके उपस्थित होते. यावेळी संतोष दीदींनी ध्यानाविषयी विस्तृत मार्गदर्शन करून सर्वांकडून ध्यानधारणेचा अभ्यास करून घेतला.

# जीवनातील प्रत्येक स्पर्धेत उतरल्याने आपल्यातील क्षमता कळते

### आयुक्त यशवंत डांगे यांचे प्रतिपादन; श्रमिकनगरच्या श्री मार्कंडेय शाळेचे स्नेहसंमेलन उत्साहात, मुलींनी केला स्त्री शक्तीचा जागर

नगर - जीवनात प्रत्येक स्पर्धेत उतरा, स्पर्धेने आपल्यातील क्षमता कळते व पुढे जाण्याची उमेद निर्माण होते. जय-पराजयाची पर्वा न करता प्रत्येक शर्यतीत उतरुन स्वत:ला सिध्द करण्याचे आवाहन मनपा आयुक्त यशवंत डांगे यांनी विद्यार्थ्यांना केले.

पद्मशाली विद्याप्रसारक मंडळाच्या श्रमिकनगर येथील श्री मार्कंडेय प्राथमिक व माध्यमिक विद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलनाच्या उद्घाटनाप्रसंगी मनपा आयुक्त डांगे बोलत होते. पद्मशाली विद्याप्रसारक मंडळाचे अध्यक्ष बाळकृष्ण सिद्दम यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमाप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून भाजपचे माजी शहर जिल्हाध्यक्ष महेंद्र (भैय्या) गंधे, मनपाचे माजी सभागृह नेते मनोज दुलम, सचिव विनायक गुडेवार, सहसचिव सविता कोटा, विश्वस्त राजेंद्र म्याना, शंकर सामलेटी, भिमराज कोडम, नवनिर्वाचित संचालिका स्नेहा छिंदम, श्रमिक जनता हाऊसिंग सोसायटीचे चेअरमन विलास सग्गम, सचिव शंकर येमूल, श्रमिक बालाजी देवस्थानचे अध्यक्ष विनोद म्याना, रोटरी क्लब ऑफ मिडटाऊनचे अध्यक्ष अजय पिसुटे, शिक्षक प्रतिनिधी सुलभा सुरकुटला, जयश्री चिंतल, प्राथमिकच्या मुख्याध्यापिका विद्या दगडे, माध्यमिकचे मुख्याध्यापक शशीकांत गोरे आदींसह शालेय शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व पालक उपस्थित होते.

पुढे बोलताना डांगे म्हणाले की, मुले पालकांचे अनुकरण करतात. पालक मोबाईलपासून लांब राहिल्यास मुले देखील मोबाईलपासून लांब राहतील. आपल्या नावाने आई-वडिलांचा परिचय व्हावा, एवढे यश प्रत्येक विद्यार्थ्यांनी जीवनात नक्की मिळवावे, असे त्यांनी सांगितले.

शालेय विद्यार्थ्यांनी ढोल व लेझीम पथकासह फुलांचा वर्षाव करुन पाहुण्यांचे स्वागत केले. प्रारंभी बालाजी मंदिरात आरती करून उपस्थित पाहुण्यांच्या हस्ते विद्यार्थ्यांच्या



पद्मशाली विद्याप्रसारक मंडळाच्या श्रमिकनगर येथील श्री मार्कंडेय प्राथमिक व माध्यमिक विद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले.

गणित-विज्ञान, रांगोळी, चित्रकला व हस्तकला प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. विद्यार्थिनींनी स्वागतगीत व ईशस्तवन सादर केले.

प्रास्ताविकात मुख्याध्यापिका विद्या दगडे म्हणाल्या की, आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या कामगार वर्गाच्या पाल्यांना शिक्षण देऊन त्यांचा सर्वांगीण विकास साधला जात आहे. विद्यार्थ्यांच्या संस्कारासाठी व बौद्धिक विकासासाठी विविध उपक्रम राबविले जात असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. पाहुण्यांचा परिचय माध्यमिकचे मुख्याध्यापक शशिकांत गोरे व भारतीय गाडेकर यांनी करून दिला. शालेय विद्यार्थ्यांनी विविध क्षेत्रात मिळवलेल्या यशाचे अहवाल वाचन भीमराज कोडम यांनी केले. कला, क्रीडा, शैक्षणिक व विविध स्पर्धेत नैपुण्य मिळवणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांना उपस्थित पाहुण्यांच्या हस्ते बक्षिसे देण्यात आली. आदर्श पालक म्हणून प्रियंका पासकंटी, नूती राजेश व आदर्श विद्यार्थी म्हणून प्रेक्षा जोरगील, आदिती राऊत, विजय पाटपेल्ली, वेदांत झुंजूर यांना सन्मानित करण्यात आले. किरण कहेकर व अर्चना शिंदे या शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या सहकार्याने संपादित केलेल्या भारतीय संस्कृतीतील विविधतेतील एकता या हस्तलिखिताचे प्रकाशन करण्यात आले.

महेंद्र गंधे म्हणाले की, प्रामाणिकपणे केलेल्या कष्टाचे गुण मिळतात. कठोर परिश्रम शिवाय पर्याय नाही. परिश्रम जिद्द चिकाटीने यश मिळते. सर्वसामान्यांच्या मुलांना घडविण्याचे कार्य मार्कंडेय शाळेत होत आहे. या शाळेच्या अद्यावत इमारतीसाठी राज्य सरकारच्या माध्यमातून प्रयत्न करणार असल्याचे आश्वासन त्यांनी दिले. तर या भागातील सर्वसामान्यांसाठी रुग्णालय उभारण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला.

बाळकृष्ण सिद्दम यांनी विजयाने हुरळून जाऊ नका व पराभवाने खचू नका. प्रत्येक विद्यार्थ्यांमध्ये विविध कलागुण दडलेले असतात ते शिक्षक व पालकांना ओळखता आले पाहिजे. विद्यार्थ्यांनी मिळालेल्या संधीचे सोने करण्याचे त्यांनी सांगितले.

विद्यार्थ्यांनी भक्तीगीतांसह सांस्कृतिक कार्यक्रमातून भारतीय संस्कृतीचे दर्शन घडविले. शालेय विद्यार्थिनींनी देवीच्या गीतांमधून स्त्री शक्तीचा जागर केला. तर छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमावर सादर केलेल्या गीतांमधून विद्यार्थ्यांमध्ये उत्साह संचारला होता. शिवाजी महाराजांच्या जय घोषाने परिसर दुमदुमले. पारंपारिक लोकगीतांनी उपस्थितांची मने जिंकली. तर टाळ्यांच्या कडकडाटात विद्यार्थ्यांच्या कलागुणांना दाद देण्यात आली. सूत्रसंचालन वैशाली वरुडे, सुचिता भावसार तसेच सांस्कृतिक कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुलभा सुरकुटला व मिनाक्षी बिंगेवार यांनी केले. आभार किरण कहेकर यांनी मानले.



पुरुष ग्रीकोरोमन, महिला महाराष्ट्र केसरी निवड चाचणी उत्साहात पार पडली. (छाया - लहू दळवी

# अहिल्यानगरचा कुस्ती संघ जाहीर

### पुरुष ग्रीकोरोमन, महिला महाराष्ट्र केसरी निवड चाचणी उत्साहात

नगर - पुरुष ग्रीको रोमन व महिला महाराष्ट्र केसरी स्पर्धेसाठी अहिल्यानगर जिल्हा निवड चाचणी सावेडी येथील संभाजीराजे कुस्ती केंद्रात पार पडली. यामध्ये ७ महिला व १० पुरुषांचा संघ जाहीर करण्यात आला असल्याची माहिती जिल्हा कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष आ. संग्राम जगताप यांनी दिली.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर, कुस्तीगीर संघाचे सचिव प्रा.डॉ.संतोष भुजबळ, माजी नगरसेवक सागर बोरुडे, जिल्हा कार्यकारणी सदस्य निलेश मदने, माधव सावंत, हनुमंत फंड, संदीप गायकवाड, पोपट शिंदे, कानिफनाथ मुखेकर, अजय आजबे, एकनाथ उचाळे, साहेबराव पवार, मच्छिंद्र उचाळे आदि उपस्थित होते

अहिल्यानगर जिल्हा कुस्ती संघ निवड चाचणी स्पर्धेमध्ये ४८ कुस्तीकरांनी सहभाग नोंदविला असून स्पर्धेत प्रथम क्रमांक प्राप्त कुस्तीगीर वर्धा येथे होणाऱ्या राज्य अजिंक्यपद कुस्ती स्पर्धेत नगरचे प्रतिनिधित्व करणार आहे. या स्पर्धेसाठी पंच आणि तांत्रिक अधिकारी म्हणून आंतरराष्ट्रीय कुस्ती पंच प्रा. संभाजी निकाळजे, पंच विवेक नायकल, ईश्वर तोरडमल तर संयोजक म्हणून निलेश मदने यांनी काम पाहिले.

वरिष्ठ महिला संघ - धनश्री संपत नवथर (नेवासा) दिव्या भाऊसाहेब धावडे (अहिल्यानगर) श्रुती सुखदेव कोकणे (संगमनेर) चैताली संजय घुले (संगमनेर) धनश्री हनुमंत फंड (श्रीगोंदा) गौरी कानिफनाथ मुखेकर (पाथर्डी) पल्लवी रामभाऊ खेडकर (पाथर्डी). पुरुष ग्रीको रोमन संघ : ओंकार रोडगे (नेवासा) तेजस गंगाधर वारुळे (अहिल्यानगर) अभिजीत भाऊसाहेब वाघुले (नेवासा) कुमार किशोर देशमाने, दीपक साहेबराव पवार, निलेश मच्छिंद्र उचाळे, पवन रमेश रोहकले, शामराव सखाराम गव्हाणे, मयूर मिलिंद जपे. महाराष्ट्र केसरी गट : अनिल शिवाजी ब्राह्मणे राहुरी यांची निवड झाले असल्याची माहिती सचिव प्राध्यापक डॉक्टर संतोष भुजबळ यांनी दिली.

# ग्राहक पंचायतीचे अध्यक्ष गजेंद्र क्षीरसागर यांना बिंदुमाधव जोशी विभागीय उत्कृष्ट कार्यकर्ता पुरस्कार

नगर - भारतीय ग्राहक चळवळीचे आद्य प्रणेते ग्राहकतीर्थ बिंदुमाधव जोशी स्मृतीप्रित्यर्थ स्व.अरुण भार्गवे पुरस्कृत विभागीय उत्कृष्ट कार्यकर्ता पुरस्कार-२०२४ ग्राहक पंचायतीचे अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष गजेंद्र क्षीरसागर यांना जाहीर झाला आहे. याबाबतची अधिकृत घोषणा ग्राहक पंचायत महाराष्ट्रचे राज्य अध्यक्ष डॉ. विजय लाड यांनी केली आहे.



हा पुरस्कार महाराष्ट्र राज्यातील पाच विभागातील ग्राहक चळवळीत निरपेक्ष भावनेने योगदान देणाऱ्या तसेच उत्कृष्ट कार्य करणाऱ्या कार्यकर्त्याला दरवर्षी दिला जातो. पुणे, नाशिक, संभाजीनगर, नागपूर, कोकण या विभागातून एका कार्यकर्त्याची या पुरस्कारासाठी निवड करण्यात येते.

नाशिक विभागातून ग्राहक पंचायत महाराष्ट्रचे अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष गजेंद्र क्षीरसागर यांची निवड करण्यात आली आहे. गजेंद्र क्षीरसागर हे पत्रकार असून जिल्हा सहकारी बँकेत अधिकारी म्हणून कार्यरत आहेत. ग्राहक चळवळीवर त्यांनी अनेक वृत्तपत्रातून लेख व स्तंभलेखन केले आहे. वृत्तपत्र, आकाशवाणी, सजग विद्यार्थी ग्राहक अभियान आदी माध्यमातून त्यांनी ३४ वर्ष ग्राहक प्रबोधनाचे कार्य केले आहे. बिंदुमाधव जोशी यांच्या समवेत ग्राहक संरक्षण परिषदांच्या निमित्ताने अनेक दौऱ्यात त्यांचा सहभाग राहिला असून बिंदुमाधव जोशी यांचे खाजगी स्वीय सहाय्यक म्हणूनही त्यांनी काम पाहिले आहे. स्वर्गीय अरुण भार्गवे हे राज्यातील ग्राहक चळवळीतील एक तळमळीचे कार्यकर्ते होते. त्यांच्या निधनानंतर आशुतोष भार्गवे यांनी हा पुरस्कार देण्यास सुरुवात केली.



लव्हली फ्रेंडसचे सक्रिय कार्यकर्ते व युवा उद्योजक राजेंद्र नहार यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांचा सत्कार करताना बाळू गुगळे, वसंत पोखरणा, अभय पोखरणा, सुनिल चोपडा, संजय देवतरसे.

# ख्रिस्तजन्मोत्सवनिमित्त 'प्रेअर वॉरियर्स' तर्फे साड्यांचे वाटप

नगर– प्रेअर वॉरियर्स बहुउद्देशीय सामाजिक संस्था अहिल्यानगर यांच्यातर्फे ख्रिस्तजन्मोत्सव सणानिमित्त शांतीपूर तारकपूर येथे गरजू माता बहीणींकरिता उत्कृष्ट प्रतीच्या साड्यांचे वाटप करण्यात आले. त्याचबरोबर सर्वांकरिता प्रीती भोजनाची व्यवस्था करण्यात आली. सर्व लहान थोरांनी या ख्रिस्त जयंती सोहळ्याचा आनंद लुटला.

यावेळी ब्र.दिलीप सातपुते यांनी सुरुवातीची प्रार्थना केली व रेव्ह.विजय काकडे पाळक यांनी वाचनातून उत्कृष्ट मार्गदर्शन केले. तसेच शेवटची प्रार्थना रेव्ह. संजय मिसाळ पाळक यांनी केली व शेवटचा आशीर्वाद रेव्ह.प्रकाश बनसोडे पाळक यांनी दिला.

त्याचप्रमाणे संस्थेच्या पुढील कारकीर्दीकरता रेव्ह.अशोक पठारे पाळक यांनी शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी संस्थेचे पदाधिकारी सिस्टर अलका पवार, ब्रदर प्रियेश वाघमारे, ब्रदर शाम वैरागर, ब्रदर सुनील जाधव, ब्रदर राहुल वडागळे, ब्रदर विशाल शेलार, ब्रदर बाळासाहेब वडागळे, ब्रदर गौरव वैरागर, ब्रदर स्वप्निल वैरागर, ब्रदर रवी वैरागर, ब्रदर सौरभ वैरागर, ब्रदर किशोर वैरागर, ब्रदर धिवर सर, प्राध्यापक अंबादास उमाप सर, ब्रदर बाबासाहेब उमाप, ब्रदर संभाजी उमाप, ब्रदर शुभम वैरागर, ब्रदर अशोक वैरागर, बारसे मामा, ब्रदर भाऊ भिंगारदिवे, त्याचप्रमाणे संस्थेच्या महिला ग्रुपच्या अध्यक्षा सिस्टर बेबीताई भालेराव, सि.कविता जोसेफ वैरागर (पाळकीनबाई) व संस्थेच्या इतर सर्व महिला बहिणी मोठ्या प्रमाणात उपस्थित होत्या.


प्रेअर वॉरियर्स बहुउद्देशीय सामाजिक संस्था अहिल्यानगर यांच्यातर्फे ख्रिस्तजन्मोत्सव सणानिमित्त शांतीपूर तारकपूर येथे गरजू माता बहीणींकरिता उत्कृष्ट प्रतीच्या साड्यांचे वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून ख्रिस्ती युथ ग्रुप सारसनगर अध्यक्ष विजय अंधारे त्याचप्रमाणे सिस्टर उषाताई उनवणे, सि.मोना क्षेत्रे, सि.मीनल क्षेत्रे, सि.प्रमोदिनी शिरसाठ, सि.सरला, डॉ.वाखुरे, सि.स्वप्निजा, सि.सविता जाधव, सि.ज्योती उमाप, सि.मनीषा उमाप, सि.रूपाली उमाप, सि.वंदना ससाणे, सि.संगीता काळे, सि.सुचेता काळे, सि.धिवर, सि.महिमा, सि.स्वप्ना सोनवणे, तसेच समाजातील अनेकांचे योगदान व उपस्थिती लाभली व अशा आनंदी वातावरणामध्ये ह्या आशीर्वादित कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

शेवटी संस्थेचे अध्यक्ष संस्थापक पास्टर जोसेफ वैरागर पाळक यांनी मनोगत व्यक्त करून सर्व उपस्थित माता–बहिणींचे आभार मानले.


आंतरराष्ट्रीय मानवाधिकार दुत संघटना व भारत बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक मानवाधिकार दिनाचे औचित्य साधून देण्यात येणारा भारतभूषण राष्ट्रीय पुरस्कार दिनेश लोंढे यांना प्रदान करण्यात आला.

# दिनेश लोंढे यांना भारतभूषण राष्ट्रीय पुरस्कार प्रदान

नगर – आंतरराष्ट्रीय मानवाधिकार दुत संघटना व भारत बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक मानवाधिकार दिनाचे औचित्य साधून मुंबई येथे सामाजिक क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल यंदाचा मानाचा भारतभूषण राष्ट्रीय पुरस्कार –२०२४ ने अहिल्या नगर येथील शिवसेना अंगीकृत सेल शिव सामर्थ सेना अहिल्या नगर जिल्हा समन्वयक व श्रीकांत शिंदे फाउंडेशन समन्वयक दिनेश लोंढे यांना प्रदान करून सन्मानीत करण्यात आले.

याप्रसंगी संघटनेचे अध्यक्ष अविनाश साकुंडे, राष्ट्रीय अध्यक्ष अफसर कुरेशी, अंधेरीच्या स्थानिक आमदार हारून शेख, एसीपी मुंबई पोलीस श्रीमती सुरेखा कपिले, बॉलिवूड अभिनेत्री श्रावणी गोस्वामी, मिस इंडिया २०२४ पिया रॉय, महाराष्ट्र पर्यटन विभागाचे सौ. प्रीती वनगे– पवार, WHRAF चे मुंबई सचिव महेश आंब्रे, शिव सामर्थ सेना महाराष्ट्र अध्यक्ष शिव सेना नेते संदीप भोज इत्यादी उपस्थित होते.


निंबळक येथे आनंदऋषीजी नेत्रालय व डॉ. दिलीप पवार मित्रमंडळाच्या वतीने आयोजिक करण्यात आलेल्या मोफत नेत्ररोग तपासणी शिबीरामध्ये सहभागी झालेले ग्रामस्थ.

# निंबळक येथे नेत्ररोग निदान शिबीर

नगर – निंबळक येथे आनंदऋषीजी नेत्रालय व नगर पंचायत समितीचे माजी उपसभापती डॉ. दिलीप पवार मित्रमंडळाच्या वतीने नुकतेच मोफत नेत्ररोग तपासणी व अल्पदरात मोतिबिंदु शस्त्रक्रिया शिबिर आयोजित करण्यात आले होते. शिबिराचे उद्घाटन गावातील महिलांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी ३५० रूग्ण तपासणी करण्यात आली, त्यात डोळ्यांचे विविध आजारांवरील उपचार आणि मार्गदर्शन करण्यात आले, तसेच चष्मे माफक दरात देण्यात आले. २५ रुग्ण मोतिबिंदु शस्त्रक्रियेसाठी निवडण्यात आले. या शिबिरास निंबळक आणि पंचक्रोशितील ग्रामस्थांनी प्रतिसाद दिला. यावेळी आनंदऋषी नेत्रालय येथील डॉक्टरांनी तपासणी केल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी माजी जि.प.सदस्य संदेश कार्ले, दिलीप पवार, संजय पाटिल, जालिंर शिंदे, राजू होळकर, शिवाजी दिवटे, बी. डी. कोतकर व ग्रामस्थ उपस्थित होते.

# फुले दांपत्य सन्मान महारॅलीची नियोजन बैठक; माळी महासंघाची भिंगारची कार्यकारणी जाहीर

नगर – माळी महासंघ, महाराष्ट्र द्वारे राष्ट्रीय अध्यक्ष अविनाश ठाकरे, प्रदेश अध्यक्ष अरुण तिखे यांच्या मार्गदर्शनाखाली १ जानेवारी २०२५ रोजी फुले दाम्पत्य सन्मान महारॅलीचे पुणे येथे भिड़े वाडा ते फुले वाडा असे आयोजन करण्यात आलेले असून सदर महारॅलीच्या नियोजनसाठी अहिल्यानगर शहर व जिल्हा कार्यकरणीची श्रमिक, टिळक रोड, अहिल्यानगर येथे शनिवारी नियोजन बैठक झाली.


फुले दांपत्य सन्मान महारॅलीच्या नियोजन बैठकीमध्ये सहभागी झालेले माळी महासंघाचे पदाधिकारी.

यावेळी सर्व पदाधिकारी यांनी मोठ्या संख्येने सन्मान महारॅलीस एकत्रितपणे उपस्थित राहणेबाबत सर्वानुमते निर्णय घेण्यात आला.

यावेळी भिंगार शहर अध्यक्ष योगेश फुलारी यांनी माळी महासंघ भिंगार शहराची नुतन कार्यकारिणी जाहीर केली आहे. ती पुढीलप्रमाणे श्याम रासकर – सहकार आघाडी संघटक, प्रवीण साळुंखे– महासचिव, गणेश हराळे– युवक आघाडी भिंगार शहर अध्यक्ष, कानिफनाथ गव्हाणे– युवक आघाडी कार्यकारणी सदस्य, अक्षय गव्हाणे– युवक आघाडी, शहर उपाध्यक्ष, प्रशांत चौरे – युवक आघाडी कार्याध्यक्ष, कानिफनाथ जगताप –युवक आघाडी कोषाध्यक्ष, विठ्ठल दळवी–संघटक, मुकुंद पांढरे – संघटक, निखिल राऊत– भिंगार शहर सचिव, ऋषिकेश भुजबळ– भिंगार शहर सहसचिव यांना नियुक्ती पत्र प्रदान करण्यात आले आहे.

या बैठकीत योगेश फुलारी म्हणाले, भिडे वाडा येथे एक जानेवारीला फुले दांपत्य सन्मान महारॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. या महा रॅलीला समाज बांधव जातील असा निर्धार व्यक्त केला आहे.

बैठकीस माळी महासंघ अहिल्यानगर जिल्हा कार्याध्यक्ष नंदकुमार नेमाने, जिल्हाध्यक्ष भुषण भुजबळ, सहकार आघाडी जिल्हाध्यक्ष संदीप दळवी, कर्मचारी आघाडी जिल्हाध्यक्ष तुषार फुलारी, युवक आघाडी जिल्हाध्यक्ष यश भांबरकर, जिल्हा सचिव गणेश धाडगे, ज्येष्ठ आघाडी जिल्हा उपाध्यक्ष रोहिदास हराळे, जेष्ठ आघाडी जिल्हा महासचिव गोविंद चाफे, शेतकरी आघाडी शहर अध्यक्ष गणेश फुलसौंदर, अहिल्यानगर तालुका अध्यक्ष भगवान हजारे, उद्योजक आघाडी शहर अध्यक्ष दिनेश कापरे, उद्योजक आघाडी उप शहर अध्यक्ष अमोल रासकर, भिंगार शहर अध्यक्ष योगेश फुलारी, कापूरवाडीचे शिवाजी घाडगे व सर्व नूतन पदाधिकारी उपस्थित होते.

# सर्वसामान्य व्यावसायिकांना आर्थिक बळ देणार

## अध्यक्ष धीरज मैड यांचे प्रतिपादन

नगर – राष्ट्रीयकृत बँकेच्या तुलनेत संस्थेच्या माध्यमातून ग्राहकांना सुविधा पुरविण्याबरोबरच सर्वसामान्य व्यावसायिकांना आर्थिक बळ देणार असल्याचे प्रतिपादन श्री संत नरहरी मल्टीस्टेट को ऑप. क्रेडिट सोसायटीचे अध्यक्ष धीरज मैड यांनी केले.

सावेडी उपनगरातील तपोवन रोडवर (दि. २०) श्री संत नरहरी मल्टीस्टेट को ऑफ क्रेडिट सोसायटीचे उद्घाटन समारंभ पार पडला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी ह. भ. प. आदिनाथ महाराज शास्त्री (तारकेश्वर संस्थान), ह. भ. प. लक्ष्मण महाराज कराड (मेहेकरी संस्थान) यांनी भूषवले. यावेळी ह. भ. प. अतुल महाराज आदमने, भारतीय जनता पार्टी युवा मोर्चाचे अध्यक्ष अक्षय कर्डिले, सदाशिव मैड, योगेश मैड, बापूसाहेब बेद्रे, राजेंद्र टाक, (धामणगाव) रावसाहेब कर्डिले, इलिया शेख (सरपंच तिसगाव), निखिल वारे, बाळासाहेब पवार, महेश तवले, संपत नलवडे, बाबा खडसे, दीपक लांडगे, बंडू पाठक, सुनील परदेशी, गणेश गुंडाळे, सोमनाथ कातकडे, महेश लोखंडे, लक्ष्मण गवळी, यशपाल गांधी, दीपक लांडगे, अमोल खोले, उद्धव काळापहाड, आदी उपस्थित होते.


सावेडी उपनगरातील तपोवन रोडवर (दि. २०) श्री संत नरहरी मल्टीस्टेट को ऑफ क्रेडिट सोसायटीचे उद्घाटन करताना भाजपा युवा मोर्चाचे अध्यक्ष अक्षय कर्डिले आदी.

**श्री संत नरहरी मल्टीस्टेट को – ऑप. क्रेडिट सोसायटीचे उद्घाटन**

मैड म्हणाले की, ग्रामीण भागातील उद्योगांच्या व्यावसायिक वाटचालीस नवीन दिशा मिळावी यासाठी सन २०१६ तिसगाव येथे श्री संत नरहरी बिगर शेती पतसंस्थेच्या माध्यमातून समाजसेवेच्या उद्देशाने बँकेतील सभासदांना रोजगारक्षम बनवले. बचत गट, महिला समक्षीकरण, ज्येष्ठ नागरिकांना विशेष सवलत, सह सर्वसामान्य माणसांनी कष्टाने कमावलेला एक – एक रुपया जिवापाड जपणं त्याच भक्कम सुरक्षा देणे, आणि अतूट विश्वासाचे नाते वृद्धिंवंत करणे हेच आमचे मुख्य कर्तव्य असल्याने सावेडी उपनगरात मुख्य शाखा श्री संत नरहरी मल्टीस्टेट को ऑफ ग्रेट संस्थेचे सुरुवात करताना आपल्या उज्वल भविष्यासाठी आत्याधुनिक बँकिंग सेवा सुविधांसह सज्ञ झाली आहे.

सर्वसामान्य कुटुंबातील सदाशिव मैड यांनी ४५ वर्षांपूर्वी आपल्या सुवर्णकार व्यवसायातून सुरुवात केली. पंचक्रोशीतील सर्वसामान्य नागरिकांच्या विश्वासार्हता व व्यवसायातील चिकाटीचे धोरण ठेवत पुढील पिढी योगेश, आणि धीरजनेही उद्योग व्यवसायाला चालना देत, ग्रामीण भागात संत नरहरी ऑईल मिल, नरहरी पेट्रोलियम, नरहरी सुपर मार्केट, तसेच संत नरहरी ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था, उभ्या केल्या आहेत, असे भारतीय जनता युवा मोर्चाचे अध्यक्ष अक्षय कर्डिले म्हणाले.


आत्मनिर्धार पर्यावरण संवर्धन समितीच्या अध्यक्षपदी भानुदास कोतकर यांची निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करताना समितीचे सभासद.

# आत्मनिर्धार पर्यावरण संवर्धन समितीच्या अध्यक्षपदी भानुदास कोतकर यांची निवड

नगर – आत्मनिर्धार फाऊंडेशन संचलित पर्यावरण संवर्धन समितीची बैठक २२ डिसेंबर रोजी आझाद वाचनालय, निंबळक येथे झाली. यावेळी फाउंडेशनच्या वाटचालीचा आढावा अध्यक्ष महादेव गवळी यांनी उपस्थितांसमोर मांडला. तसेच आगामी काळात पर्यावरण पूरक उपक्रम राबविण्याचा ठराव मांडला. पर्यावरण संवर्धन समितीच्या कृती कार्यक्रमाची आखणी व धोरणात्मक बाबींवर विचारविनिमय करण्यात आला. उपस्थित सभासदांच्या सर्वानुमते निंबळक माध्यमिक विद्यालयाचे माजी मुख्याध्यापक भानुदास सिताराम कोतकर यांची समितीच्या अध्यक्षपदी तर संदीप गेरंगे यांची उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली. समितीचे समन्वयक म्हणून ॲड. राहुल ठाणगे यांची निवड करण्यात आली. नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा यावेळी सन्मान करण्यात आला. पहिल्या टप्प्यात २०० फळ झाडे व औषधी वनस्पतींची लागवड आणि संवर्धन करण्याचा निर्धार सभासदांनी व्यक्त केला.

दिवसेंदिवस देशभरात प्रदूषण ही एक मोठी समस्या निर्माण होत असून, पर्यावरणाचा समतोल ढासळत चालला आहे. त्यामुळे पर्जन्यमानात व वातावरणात अनपेक्षित बदल होताना दिसत आहेत. त्याचा मानवी जीवनावर व प्राणी जीवनावर विपरीत परिणाम होत आहे. आरोग्याच्या दृष्टीने नवीन आणि गंभीर समस्यांचे आव्हान यापुढील काळात आपल्यासमोर येणार आहे. त्यावर मात करण्यासाठी आपण सावध भूमिका घेण्याची आवश्यकता आहे. येत्या काळातील पर्यावरणीय समस्यांचा सामना करण्यासाठी पर्यावरण पूरक उपक्रम राबविण्याची गरज निर्माण झाली असल्यानेच आत्मनिर्धार पर्यावरण संवर्धन समितीची स्थापना करण्यात आली आहे. या माध्यमातून पर्यावरणप्रेमी नागरिकांनी एकत्र येण्याची गरज आहे, असे मत पर्यावरण संवर्धन समितीचे अध्यक्ष भानुदास कोतकर यांनी व्यक्त केले.

या प्रसंगी सुदाम घोडके, ज्योतिष अभ्यासक संतोष घोलप, साहित्यिक रामदास कोतकर, महादेव गवळी, कैलास लांडे, आसाराम लोंढे, संदीप गेरंगे, ॲड. राहुल ठाणगे, दैनिक नवा मराठाचे प्रतिनिधी संदीप बांगर व सभासद उपस्थित होते.

## बसस्थानकातून अल्पवयीन मुलीचे अपहरण

नगर – तारकपूर बस स्थानकातून अज्ञात व्यक्तीने एका अल्पवयीन मुलीला (वय १०) फूस लावून पळवून नेल्याची घटना शुक्रवारी (दि.२०) सकाळी नऊच्या सुमारास घडली. या प्रकरणी पीडित अल्पवयीन मुलीच्या आईने शनिवारी (दि.२१) सायंकाळी तोफखाना पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून अज्ञात व्यक्तीविरूध्द अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी या नगर शहरात राहतात. शुक्रवारी सकाळी त्या त्यांच्या अल्पवयीन मुलीसोबत तारकपूर बस स्थानक परिसरात असताना त्यांच्या रखवालीतून अज्ञात व्यक्तीने मुलीला फूस लावून पळवून नेले. दरम्यान, फिर्यादी यांनी मुलीचा परिसरात शोध घेतला असता ती मिळून आली नाही. त्यांनी दुसऱ्या दिवशी तोफखाना पोलिसांना माहिती दिली. पोलीस मुलीचा शोध घेत आहेत.


**नाताळनिमित्त 'डॉन बॉस्को'च्यावतीने उपनगरात स्वार्थ कॅरोलचे गायन**

नाताळ सण निमित्त डॉन बॉस्को नागरी सहकारी पतसंस्थेच्या वतीने सावेडी उपनगरात ठिकठिकाणी जाऊन प्रभू येशू जन्माची स्वार्थ कॅरोल गायनाद्वारे गायली जात आहे (छाया – विजय मते)

# बाल महोत्सवातील सूरपतीचा किताब ऊर्वी दैवज्ञला प्राप्त

नगर – नगरमधील सर्व संगीत विद्यालयांनी अधिकाधिक मेहनत घेऊन आपली कला पातळी उंचवावी, त्याचप्रमाणे संगीत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनी केवळ गुरूंनी शिकवलेल्या ज्ञानावर अवलंबून न राहता स्वतः देखील मेहनत घेऊन कला वाढवावी असे प्रतिपादन कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी संगीतज्ञ आणि आशीर्वाद ग्रुपचे अध्यक्ष श्रीराम तांबोळी यांनी केले.

श्रुती संगीत निकेतन संस्थेच्या वतीने स्व. दत्तात्रय देशपांडे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ बाल महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते, या प्रसंगी ते बोलत होते. यात गायन, वादन आणि नृत्य यांचा महोत्सव साजरा झाला. अहिल्यानगर येथील १० संगीत विद्यालायांच्या सुमारे एकशे तीस विद्यार्थ्यांनी आपली कला सादर केली. यात श्रुती संगीत निकेतन, आरोही संगीत विद्यालय, कथ्थक नृत्यालय, अंजली नृत्यालय, अनाहत तबला अकॅडमी, ब्रह्मानंद संगीत क्लासेस, सरस्वती संगीतालय, नृत्यदर्पण डान्स अकॅडमी, नृत्यझंकार, उत्कर्षा स्कूल ऑफ कथ्थक,


सूरपतीचा किताब ऊर्वी दैवज्ञला मिळाल्याबद्दल तिचा सत्कार करताना श्रीराम तांबोळी.

या संगीत विद्यालयांचा समावेश होता. डॉ. धनश्री खरवंडीकर, मकरंद खरवंडीकर, सुरेखा डावरे, प्रिया ओगले जोशी, कल्याणी कामतकर, स्वप्नील खराडे, अनुजा कुलकर्णी, अपर्णा थत्ते, शीतल देशमुख, प्रसाद सुवर्णपाठकी, कीर्ती आयचित्ते जोशी, उत्कर्षा दगडे या गुरुवर्यांचे मार्गदर्शन या विद्यार्थ्यांना लाभले. नंतर अतिशय रंगलेल्या सांगीतिक क्विझ या कार्यक्रमात सर्व विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. यात उर्वी दैवज्ञ ही विद्यार्थिनी विजेती ठरली.

अनिकेत देऊळगावकर आणि पुष्पा औटी यांनी क्विझचे परीक्षण केले. श्रावण शिंदे आणि अमोघ पळसकर यांनी खुमासदार शैलीत सूत्रसंचालन केले. या कार्यक्रमात गुंजारव या संस्कृत त्रैमासिकाच्या बाल विशेषांकाचे प्रकाशन करण्यात आले. यात विद्यार्थ्यांनी संस्कृत भाषेत लेख लिहिले आहेत. याप्रसंगी कार्यकारी संपादिका रेणुका मुळे यांनी मनोगत व्यक्त केले. या प्रसंगी लेख लिहिलेल्या बाल कलाकारांचा सत्कार करण्यात आला. डॉ. धनश्री खरवंडीकर यांनी प्रास्ताविक केले. उपाध्यक्ष भूषण भणगे यांच्या हस्ते प्रमुख अतिथिंचा सन्मान करण्यात आला. महोत्सवाच्या यशस्वितेसाठी वेदांत कुलकर्णी, भार्गव देशपांडे, संतोष खोल्लम, मोहिनी खोल्लम, शौनक कुलकर्णी, गंधार कुलकर्णी, समर्थ कोर्टीकर, सुपर्ण प्रताप, नितीश भणगे, डॉ. जयंत देशपांडे यांनी परिश्रम घेतले. या महोत्सवासाठी पवन नाईक, लक्ष्मणराव डहाळे, डॉ.मंदार भणगे आदी उपस्थित होते.


**महाराष्ट्र शासन**

**कार्यकारी अभियंता, पाटबंधारे संशोधन विभाग, नाशिक**

मेरी कॉलनी, दिंडोरी रोड नाशिक ४२२००४ ई–मेल पत्ता – eeird@rediffmail.com दुरध्वनी क्रमांक ०२५३–२९९१८८६

**दुबार (द्वितीय) ई – निविदा सुचना क्र. ०७ सन २०२४–२५**

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता पाटबंधारे संशोधन विभाग, नाशिक जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे अहिल्यानगर जिल्हयातील नोंदणीकृत मजुर सहकारी संस्था यांच्याकडून खालील कामाकरीता ई–निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ https//mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावीत. सविस्तर निविदा सुचना व ई निविदेबाबत सर्व माहिती शासनाच्या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सुचना फलकावर उपलब्ध आहे.

निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता पाटबंधारे संशोधन विभाग, नाशिक यांनी राखुन ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही. सदर निविदा सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास https//mahatenders.gov.in या संकेतस्थळावर कळविण्यात येईल.

| अ. क्र. | कामाचे नांव | जिल्हा | ई–निविदाची किंमत रुपये G.S.T. व इतर कर वगळुन) | ई– निविदा उपलब्ध कालावधी | ई– निविदा उघडण्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | मुळा उजवा तट कालव्यावरील वडाळा भेरोबा, सुलतानपूर भाव निमगांव चर योजनेचे विशेष देखभाल दुरुस्ती कामे सन २०२४–२५ | अहिल्यानगर | १२,२८,५५४/– | २३/१२/२०२४ ते ३०/१२/२०२४ | ३१/१२/२०२४ |
| २ | प्रवरा डावा तट कालव्यावरील भोकरनाला चर योजना एक्सटेशन गुमानदेव चर योजनेचे विशेष देखभाल दुरुस्तीचे कामे सन २०२४–२५ | अहिल्यानगर | १२,९६,८२६/– | २३/१२/२०२४ ते ३०/१२/२०२४ | ३१/१२/२०२४ |
| ३ | प्रवरा उजवा तट कालव्यावरील खुडसरगांव अहिल्यानगर चर योजना व टाकळीमिया चर योजनेचे विशेष देखभाल दुरुस्ती कामे–२०२४–२५ | अहिल्यानगर | १३,५५,४४९/– | २३/१२/२०२४ ते ३०/१२/२०२४ | ३१/१२/२०२४ |

जा.क्र. पासंविना / लेखा–२/१३००/ २०२४
पाटबंधारे संशोधन विभाग, नाशिक
दि. १७/१२/२०२४

जिमाका/नगर/जाहि/१८१/२०२४–२५

(श्री.द.खंदारे)
कार्यकारी अभियंता
पाटबंधारे संशोधन विभाग, नाशिक

# अर्थजगत

*तुम्ही अद्याप तुमचा इन्कम टॅक्स रिटर्न दाखल करू शकला नसाल तर घाबरून जाण्याची गरज नाही. तुमच्याकडे अजूनही रिटर्न फाइल करण्याचा पर्याय आहे. विलंब शुल्क म्हणजेच दंडासह आयटीआर ३१ डिसेंबर २०२४ पर्यंत फाइल करू शकता. उशिरा दाखल केलेले रिटर्न हे असेसमेंट वर्षाच्या अंतिम मुदतीनंतर (३१ जुलै) परंतु ३१ डिसेंबरपूर्वी भरलेले रिटर्न असते. यासाठी करदात्यांना ५ हजार रुपये विलंब शुल्क भरावे लागणार आहे. एकूण उत्पन्न ५ लाख रुपयांपेक्षा कमी असल्यास, विलंब शुल्क १,००० रुपये असेल.*

## नफावसुलीला ब्रेक लागेल?

■ शेअर बाजार

'संपेल ना कधीही, हा खेळ सावल्यांचा...' या मराठी गीताची प्रचिती शेअर बाजारामध्ये गुंतवणूकदारांना आणि ट्रेडर्सना सातत्याने येत असते. दिवस आणि रात्र हे जसे कालमानाचे चक्र आहे तशाच प्रकारे तेजी आणि मंदी किंवा वृद्धी आणि घसरण हे शेअर बाजाराचे व्यवच्छेदक लक्षण आहे. कोविडच्या काळात शेअर बाजाराशी जोडल्या गेलेल्या नवरिटेलर्सनी काही आठवड्यात, महिन्या-दोन महिन्यांमध्ये गुंतवलेली रक्कम दुप्पट, १५० टक्क्यांनी, वर्षभरात ४५० टक्क्यांनी वाढल्याची उदाहरणे पाहिली-अनुभवली आहेत. परंतु शेअर बाजाराचा तो गुणविशेष नाहीये, हे लक्षात घेतले पाहिजे. शेअर बाजारामध्ये दीर्घकालीन दृष्टिकोन ठेवून गुंतवणूक करणाऱ्यांनाच चांगला परतावा शाश्वत रुपाने मिळतो, हे आजवरच्या इतिहासाने सिद्ध केले आहे. असे गुंतवणूकदार बाजारातील पडझडीमुळे फारसे चिंतीत नसतात. त्यांची जोखीमही कमी असते. परंतु जोखीम पत्करणाऱ्या म्हणजे ज्यांना अॅग्रेसिव्ह ट्रेडर्स म्हटले जाते त्यांना गतसप्ताहात झालेली पडझडीसारख्या घसरणी त्रासदायक ठरतात. गेल्या आठवड्यात अमेरिकन फेडरल रिझर्व्हचे चेअरमन जेरॉम पॉवेल यांनी व्याजदरांच्या सद्यस्थितीबाबत आणि पुढील वर्षातील स्थितीबाबत व्यक्त केलेल्या भूमिकेमुळे जगभरातील बाजारात तुफान पडझड झाली. खुद्द अमेरिकेतील डाऊ जोन्स आणि नॅसडॅक हे दोन प्रमुख निर्देशांक ७०० ते १००० हून अधिक अंकांनी कोसळले. पाठोपाठ भारतीय शेअर बाजारातही त्याचे तीव्र पडसाद



उमटले आणि गेल्या दोन वर्षांतील सर्वांत मोठी साप्ताहिक घसरण दर्शवत बाजार बंद झाला. फेडच्या निर्णयानंतर उसळी घेतलेला डॉलर इंडेक्स वरच्या दिशेने सरकत असताना भारतीय रुपया आणि शेअर बाजार वेगाने खालच्या दिशेने घसरत होते.

नोव्हेंबरचा उत्तरार्ध आणि डिसेंबर महिन्यातील सुरुवातीच्या दोन आठवड्यांमध्ये सलग तेजीचा झेंडा फडकावणाऱ्या भारतीय शेअर बाजारात २० डिसेंबर रोजी संपलेल्या सप्ताहात सेन्सेक्समध्ये ४.९८ टक्क्यांची म्हणजेच ४०९१ अंकांची घसरण झाली आणि तो ७८०४१.५० वर बंद झाला; तर निफ्टीमध्ये ४.७६ टक्क्यांची म्हणजेच तब्बल ११८० अंकांची घसरण झाली आणि तो थेट २३५८७.५० च्या पातळीवर बंद झाला. लार्ज कॅप इंडेक्समध्ये ही घट अधिक म्हणजे ५ टक्क्यांवर पोहोचली; तर मिडकॅप इंडेक्स ३ टक्क्यांनी घसरले. ऊर्जा आणि धातू क्षेत्रातील समभागात सर्वाधिक म्हणजे ७ टक्क्यांची घसरण झाली; तर कॅपिटल गुडस् इंडेक्स आणि टेलिकॉम इंडेक्स अनुक्रमे ६ आणि ५.७ टक्क्यांनी घसरले. गतसप्ताहात विदेशी संस्थात्मक गुंतवणूकदारांनी १५८२८.११ रुपयांच्या समभागांची विक्री केली; तर डीआयआयकडून ११८७३.९२ कोटी रुपयांच्या समभागांची खरेदी केली गेली आहे.

परदेशी संस्थागत गुंतवणूकदार भारतीय शेअर बाजारातून गुंतवणूक काढत आहेत. यामुळे १३ डिसेंबर रोजी संपलेल्या आठवड्यात भारताकडील परकीय चलन साठा दोन अब्ज डॉलरने कमी होऊन ६५२.८ अब्ज डॉलर या पातळीपर्यंत खाली आला आहे. या अगोदरच्या आठवड्यामध्ये भारताकडील परकीय चलन साठा ३.२ अब्ज डॉलरने कमी झाला होता. गेल्या दोन महिन्यापासून भारतीय परकीय गंगाजळीमध्ये घट होत असल्याचे दिसून येते. रुपयाचे मूल्य सध्या निचांकी पातळीवर आहे. अशा परिस्थितीत रुपयाला आधार देण्यासाठी रिझर्व बँक हस्तक्षेप करत आहे. यासाठी डॉलरचा वापर केला जात आहे. यामुळेही भारताकडील परकीय चलन साठ्यात मोठ्या प्रमाणात घट होत असल्याचे दिसून येत आहे.

टेक्निकल चार्ट पाहिल्यास बऱ्याच कालावधीनंतर निफ्टी २०० एसएमएच्या खाली बंद झाला आहे. निफ्टीसाठी चालू आठवड्यात २१ नोव्हेंबरचा नीचांक २३,२६३ ही पातळी महत्त्वाची आहे. ती तोडून निफ्टी खाली घसरल्यास पडझड अधिक तीव्र होऊ शकते. याउलट २३८०० ची पातळी ओलांडून वर स्थिरावल्यास पुन्हा २४ हजारांकडे निफ्टी जाऊ शकतो. सध्याचा एकंदरीत ट्रेंड पाहता सेल ऑन राईज ही रणनीती प्रभावी ठरेल. त्यामुळे २३८०० ते २४ हजारांदरम्या निफ्टी आल्यास लाँग पोझिशन्समधून ट्रेडर्सनी बाहेर पडणे उचित ठरेल. चालू आठवड्यात नाताळच्या सुट्टीमुळे बाजाराचे कामकाज चार दिवसच चालणार आहे. हा आठवडा मासिक समाप्तीचा आहे. शुक्रवारी अमेरिक बाजारात जोरदार पुलबॅक दिसून आला असला आणि एसजीएक्स निफ्टी १३० हून अधिक अंकांची वाढ दर्शवत असला तरी जागतिक पटलावरील घडामोडींचे परिणाम नकारात्मक राहण्याची शक्यता आहे. अर्थात त्यांवर लक्ष ठेवून राहावे लागेल. कारण रशियाचे राष्ट्राध्यक्ष ब्लादीमिर पुतीन यांनी डोनाल्ड ट्रम्प यांच्या रशिया-युक्रेन युद्धसमाप्तीबाबत केलेल्या वक्तव्याला पुष्टी देत आपण कोणाशीही चर्चेसाठी तयार असल्याचे म्हटले आहे. पण त्याच वेळी रशियातील कझानमध्ये ९/११ सारखा भीषण हल्ला करण्यात आला आहे. इकडे आखातात इस्राईल आणि हमास यांच्यातील युद्धबंदी ठराव पूर्णत्वाला जाण्याच्या चर्चा सुरू आहेत.

सध्याच्या घसरणीच्या आणि अनिश्चिततेच्या काळात संयम बाळगत बाजारापासून दूर राहणे योग्य ठरणार आहे. तरीही अॅग्रेसिव्ह ट्रेडर्सना या घसरणीचा लाभ घ्यायचा असेल तर डिफेन्स, फार्मा, आयटीसारख्या क्षेत्रात तसेच रेल्वे, पॉवर, कॅपिटल गुडस् यांसारख्या क्षेत्रातील चांगल्या कंपन्यांच्या समभागांची पडझडीमध्ये खरेदी करता येईल. जीएसटी कौन्सिलमध्ये घेण्यात आलेल्या निर्णयांचे पडसाद बाजारात चालू आठवड्यात दिसून येतील. निफ्टी जर २३ हजारांखाली घसरल्यास ही पडझड २२ हजारांपर्यंत जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे आततायीपणाने गुंतवणूक करण्याऐवजी थोडा संयम बाळगणे उचित ठरेल.

## विलंब शुल्कासह आयटीआर म्हणजे काय?

आजकाल, स्टार्टअप्सच्या वाढीमुळे आणि संस्थापकांच्या व्यस्त वेळापत्रकामुळे, अनेक वेळा ते ३१ जुलैपर्यंत त्यांचे इन्कम टॅक्स रिटर्न भरू शकत नाहीत. अशा परिस्थितीत, त्यांना विलंबित रिटर्न भरावे लागेल, जे कलम १३९(४) अंतर्गत येते. परंतु यामध्ये एक मोठी समस्या अशी आहे की उशिरा रिटर्न भरणारे व्यवसाय मालक आणि सल्लागार भविष्यातील वर्षांच्या नफ्यासह त्यांच्या व्यवसायातील तोटा भरून काढू शकत नाहीत. याचा अर्थ असा आहे की जर तुमचे नुकसान झाले असेल, तर तुम्ही ते भविष्यातील नफ्याशी जुळवून घेऊ शकणार नाही. लहान व्यवसाय मालक आणि सल्लागारांसाठी सर्वोत्तम मार्ग म्हणजे एप्रिलपासूनच त्यांची खाती तयार करणे आणि ३१ जुलैपूर्वी नियमित आयटीआर फाइल करणे. हे त्यांना भविष्यातील नफ्याच्या तुलनेत त्यांचे व्यावसायिक नुकसान समायोजित करण्यास आणि कर वाचविण्यास सक्षम करेल.

**आयकर विवरणपत्र वेळेवर न भरण्याचे परिणाम**

प्रत्येक करदात्याने वेळेवर इन्कम टॅक्स रिटर्न (ITR) भरणे खूप महत्त्वाचे आहे. जर तुम्ही तुमचा रिटर्न नियत तारखेपर्यंत भरला नाही, म्हणजे ३१ जुलै, तर तुम्हाला केवळ दंड आणि व्याजच नाही तर गंभीर कायदेशीर परिणाम देखील भोगावे लागू शकतात. तुम्ही रिटर्न उशिरा भरल्यास, तुमच्या व्यवसायातील तोटा पुढील वर्षात समायोजित केला जाणार नाही आणि परतावा देखील वेळेवर मिळणार नाही.

नोटीस मिळाल्यानंतरही तुम्ही जाणूनबुजून इन्कम टॅक्स रिटर्न भरत नसल्यास आणि त्याकडे दुर्लक्ष केल्यास, आयकर विभाग तुमच्याविरुद्ध कायदेशीर कारवाई करू शकतो. यामुळे ३ महिने ते २



वर्षांपर्यंत तुरुंगवास आणि दंड होऊ शकतो. तुमची थकबाकी जास्त असल्यास, तुरुंगवासाची शिक्षा ७ वर्षांपर्यंत वाढू शकते.

जर तुम्ही तुमच्या उत्पन्नाची चुकीची माहिती दिली असेल तर आयकर अधिकारी तुमच्या थकबाकीच्या ५०% पर्यंत दंड आकारू शकतो. आयकर कायद्याच्या कलम २३४अ अंतर्गत, रिटर्नला उशीर झाल्यास तुम्हाला दरमहा १% दराने करावर व्याज द्यावे लागेल. हे व्याज ३१ जुलै २०२४ (आर्थिक वर्ष २०२३-२४) च्या देय तारखेनंतर लगेच लागू होईल. तुम्ही जितका उशीर कराल तितके जास्त व्याज तुम्हाला द्यावे लागेल.

परताव्यात विलंब : जर तुम्ही सरकारला जास्त कर भरला असेल आणि तुम्हाला परतावा मिळवायचा असेल, तर रिटर्न वेळेवर भरल्याने तुम्हाला रिफंड लवकर मिळण्यास मदत होईल. रिटर्न उशीरा भरल्याने रिफंड मिळण्यास विलंब होऊ शकतो.




### विलंबित ITR कसा दाखल केला जातो?

- **पायरी १:** तुमच्या ई-फायलिंग खात्यात लॉग इन करा.
- **पायरी २:** 'ई-फाइल' वर क्लिक करा 'इन्कम टॅक्स रिटर्न' निवडा 'फाइल इन्कम टॅक्स रिटर्न' वर क्लिक करा.
- **पायरी ३:** संबंधित मूल्यांकन वर्ष निवडा.
- **पायरी ४:** 'स्टार्ट न्यू फाइलिंग' बटणावर क्लिक करा.
- **पायरी ५:** तुमची योग्य स्थिती निवडा (जसे की वैयक्तिक, एचयुएफइ.).
- **पायरी ६:** आता लागू होणारा आयटीआर फॉर्म निवडा.
- **पायरी ७:** 'वैयक्तिक माहिती' विभागावर क्लिक करा आणि तुमची सर्व वैयक्तिक माहिती बरोबर असल्याची खात्री करा.
- **पायरी ८:** फाइलिंग विभागाकडे स्क्रोल करा आणि विभाग १३९(४) निवडा.
- **पायरी ९:** तुमच्या उत्पन्नाच्या सर्व स्रोतांचे तपशील भरा आणि कर भरण्यासाठी पुढे जा.
- **पायरी १०:** फाइलिंग प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी तुमचे रिटर्न इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सत्यापित (ई-व्हेरिफाय) करा. ही पायरी अत्यंत महत्त्वाची आहे कारण ई-व्हेरिफिकेशनशिवाय रिटर्नवर प्रक्रिया केली जाणार नाही.

## असंघटित क्षेत्रातील कामगारांसाठी ई-श्रम योजना

**केंद्र सरकारच्या वतीने असंघटित क्षेत्रातील कामगारांसाठी आर्थिक मदत म्हणून ई-श्रम कार्ड पेन्शन योजना सुरू करण्यात आली आहे. या योजनेच्या माध्यमातून ई-श्रम कार्डधारकांना दरवर्षाला ३६ हजार रुपयांची पेन्शन दिली जात आहे. ई-श्रम पेन्शन कार्ड योजना असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्यांसाठी असून त्यामुळे त्यांच्या उदरनिर्वाहासाठी निश्चित रक्कम हाताशी राहात आहे.**

देशात असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्यांची संख्या लक्षणीय आहे. त्यांचे दैनंदिन जीवन खूपच अडचणीचे असते. त्यांची आर्थिक स्थिती सामन्यांपेक्षा बिकट असते. काम मिळाले तरच पैसे मिळत असतात. या गोष्टींचे आकलन करत केंद्र सरकारने असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांना आर्थिक मदत करण्यासाठी २०२०-२१ पासून ई-श्रम कार्ड पेन्शन योजना सुरू केली. या कार्डचा लाभ देशातील असंघटित क्षेत्रातील कामगार, मजुरांना मिळतो. यानुसार लाभार्थ्यांना वार्षिक ३६ हजार रुपये पेन्शन दिली जाते. या योजनेतंगत असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्या मजुरांना त्यांच्या विशिष्ट वयानंतर पेन्शन सुरू होते. त्याची नोंदणी नि:शुल्क आहे.

ई-श्रम कार्ड पेन्शन योजनेतंगत लाभार्थ्यांस ६० वर्ष पूर्ण झाल्यानंतर तीन हजार रुपये दरमहा याप्रमाणे पेन्शन दिली जाते. म्हणजेच ३६ हजार रुपये वार्षिक पेन्शन या कार्ड योजनेतंगत मिळते. तसेच ई-श्रम कार्ड योजनेतील लाभार्थ्यांना दोन लाख रुपयांचा अपघात विमा देखील मिळतो. लाभार्थ्याचा अपघातात मृत्यू झाला तर त्याच्या जोडीदारास आर्थिक लाभ दिले जातात. कामगार आणि रोजगार मंत्रालयाच्या संकेतस्थळावर किंवा सीएससी केंद्राच्या माध्यमातून मोफत नोंदणी केली जाते. ही योजना कामगारांना सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी सुरू करण्यात आली आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी ऑनलाइन आणि ऑफलाइन अशा दोन्ही पद्धतीने अर्ज करता येऊ शकतो.

**पात्रता : अर्जदार भारतीय रहिवासी असावा :** इ-श्रम कार्ड पेन्शन योजनेसाठी असंघटित क्षेत्रात कामगार असणे गरजेचे आहे.

अर्जदार कामगारांचे वय १८ ते ४० दरम्यान असावे

कामगार अर्जदाराचे मासिक उत्पन्न १५ हजारापेक्षा अधिक नसावे. मात्र काहीवेळा उत्पन्नाच्या मर्यादेत बदल होऊ शकतो.

**ई-श्रम कार्ड पेन्शन योजनेचे वैशिष्ट्ये :** देशभरातील ई-श्रम कार्डधारकांचा सामाजिक आर्थिक विकास व्हावा आणि त्यांचे भवितव्य उज्ज्वल होण्यासाठी केंद्र सरकारने ई-श्रम पेन्शन योजना सुरू केली आहे.

ई श्रम कार्ड पेन्शनधारकांना ६० वर्ष पूर्ण केल्यानंतर त्यांना तीन हजार रुपये दरमहा पेन्शन मिळेल आणि निवृत्तीनंतर मिळणाऱ्या पैशातून त्यांना कुटुंबाचा खर्च भागविता येईल.

पेन्शनच्या रुपातून मिळणारे पैसे हे कामगारांसाठी एक उत्पन्नाचा स्रोत राहिल.

या योजनेतून ठरावीक रक्कम मिळत असल्याने त्यांना कोणावरही विसंबून राहण्याची आवश्यकता नाही.

या योजनेतून त्यांचा सामाजिक, आर्थिक विकास होण्यास मदत मिळेल आणि त्यांना हक्काची पेन्शन मिळेल.




**कोण करू शकतो अर्ज**

सेल्समन, दुकानात काम करणारे कर्मचारी, ऑटोचालक, मेंढीपाळ, दुग्ध व्यवसाय करणारे, पंक्चर काढणारे, सर्व पशुपालक, फेरीवाले, डिलिव्हरी बॉय, वीट भट्ट्यावर काम करणारे मजूर यांना ई-श्रम कार्ड पेन्शन योजनेसाठी अर्ज करता येणार आहे.

### ई-श्रम कार्ड पेन्शन योजनेसाठी आवश्यक कागदपत्रे

आधारकार्ड, खाते पासबूक, मोबाईल नंबर, मेल आयडी, पासपोर्ट आकाराचा फोटो, रेशन कार्ड आदी कागदपत्रे असणे गरजेचे आहे.

**ऑनलाइन अर्जाची प्रक्रिया**

ई-श्रम कार्ड पेन्शन योजनेचा लाभ घेण्यासाठी ऑनलाइन अर्ज करण्याची सुविधा उपलब्ध आहे. यानुसार सरकारच्या अधिकृत संकेतस्थळावर जावे. तेथे होमपेजवर योजनांवर क्लिक करावे लागेल. त्यानंतर 'पीएमएसवायएम' पर्यायाची निवड करावी लागेल. यानंतर योजनेची माहिती येईल. तेथे लॉगिनवर क्लिक करा. क्लिक केल्यानंतर एक नवीन पेज येईल आणि सेल्फ एन्रॉलमेंट पर्यायावर क्लिक करावे लागेल. नंतर ओटीपी येईल आणि त्यानंतर इ- श्रम कार्ड पेन्शन योजनेचा अर्ज समोर येईल. तेथील सूचनेनुसार अर्ज भरावा लागेल. ऑनलाइन कागदपत्रे त्यांच्या फॉरमॅटमध्ये अपलोड करावी लागतील आणि फॉर्म सबमिट करायचा आहे. अर्ज भरताच ई-श्रम कार्ड तयार होईल.

ऑफलाइन पद्धतीने अर्ज करायचा असेल तर तुम्हाला जवळच्या सीएससी केंद्रावर जावे लागेल. तेथे तुमच्याकडे असणारी सर्व कागदपत्रे जमा करावी लागतील. सीएससी केंद्रचालकाच्या माध्यमातून ई-श्रम कार्ड पेन्शन योजनेसाठी कदाचित शुल्क आकारले जावू शकते. अर्ज भरल्यानंतर तुम्हाला एक पावती दिली जाईल आणि त्यानंतर सीएससी केंद्र चालकाचे माफक शुल्क भरावे लागेल. अशा रितीने ई-श्रम कार्डसाठी ऑफलाइन अर्ज करू शकता.




## बँकांकडून विम्याची अट घातल्यास...

■ जाणून घ्या

अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी स्टेट बँक ऑफ इंडिया इकॉनॉमिस्ट कॉन्क्लेव्हमध्ये बोलताना असे म्हटले आहे की, बँकिंग इन्शुरन्समुळे विम्याचे क्षेत्र विस्तारले आहे; परंतु यामुळे चुकीच्या विक्रीलाही चालना मिळाली आहे. इन्शुरन्स रेग्युलेटरी अँड डेव्हलपमेंट अथॉरिटी ऑफ इंडियाचे अध्यक्ष देवा शीश पांडा यांनी देखील सहमती दर्शवली आणि बँकांद्वारे विमा पॉलिसींच्या चुकीच्या विक्रीबद्दल वाढत्या चिंतांवर प्रकाश टाकला आहे.

**चुकीच्या विक्रीचे प्रकार कोणते?**

मुदत ठेवी म्हणून विमा सादर करणे: बँकांचे रिलेशनशिप मॅनेजर अनेकदा उच्च-परताव्याच्या मुदत ठेवी म्हणून विमा पॉलिसी सादर करून ग्राहकांची दिशाभूल करतात. कधीकधी ते ३ ते ५ वर्षांच्या कालावधीतील अल्प-मुदतीची गुंतवणूक म्हणून विमा पॉलिसी सादर करतात.

**कर्जासह विमा:** टर्म इन्शुरन्स, प्रॉपर्टी इन्शुरन्स किंवा अन्य विमा पॉलिसी खरेदी करणे ही कर्ज मंजुरीसाठी पूर्व अट म्हणून ऑफर केली जाते. यामुळे कर्ज घेणाऱ्या व्यक्तीपुढे त्या पॉलिसी खरेदी करण्याशिवाय दुसरा पर्याय राहात नाही. काही वेळा ग्राहकांना टर्म लाइफ पॉलिसींऐवजी वैयक्तिक अपघात कव्हर विकले जाते जे कुटुंबाचे कर्ज दायित्वापासून पूर्णपणे संरक्षण करत नाही. ज्येष्ठ नागरिकांसाठी पॉलिसी: युनिट-लिंक्ड इन्शुरन्स प्लॅन्स, डिफर्ड अॅन्युइटी आणि इनकम गॅरंटीड प्लॅन्स साधारणपणे ज्येष्ठ नागरिकांना चुकीच्या पद्धतीने विकल्या जातात. कधीकधी अशा योजना ज्येष्ठ नागरिकांना एफडीचा पर्याय म्हणून विकल्या जातात. परंतु ज्येष्ठ नागरिकांना या योजनांच्या अटी आणि जोखमींबाबत योग्य माहिती दिली जात नाही. याखेरीज नियमित प्रीमियम असलेल्या योजना कधीकधी एकल-प्रिमियम पॉलिसी म्हणून चुकीच्या पद्धतीने विकल्या जातात. जेव्हा ग्राहकांना कळते की त्यांना एकरकमी वार्षिक प्रीमियम भरावा लागतो, तेव्हा बरेच जण पैसे भरण्यास असमर्थ असतात.

**काय काळजी घ्यायला हवी?**

या पार्श्वभूमीवर कर्जदारांनी हे जाणून घेतले पाहिजे की कर्ज मिळविण्यासाठी कोणतीही विमा पॉलिसी घेणे बंधनकारक नाही. नवीन पॉलिसी घेण्याऐवजी, तुमची विद्यमान जीवन विमा पॉलिसी कर्ज कवच म्हणून ठेवण्याचा विचार करा. तुम्हाला उच्च परतावा किंवा हमीपरताव्याची ऑफर दिली जात असल्यास, त्यांच्यापासून दूर रहा. ज्या ऑफर्सवर विश्वास ठेवता येणार नाही अशा पॉलिसींबाबत विमा कंपनीला कॉल करा आणि पॉलिसीच्या सत्यतेची पुष्टी करा. कोणतीही पॉलिसी तुमच्या गरजा पूर्ण करत असल्याची खात्री करा. ती तशी नसल्यास ती नाकारण्याचा पूर्ण अधिकार कर्जदाराला आहे. कोणतीही आरोग्य विमा पॉलिसी खरेदी करण्यापूर्वी, त्याच्या उप-मर्यादा, बहिष्कार, पोर्टेबिलिटी आणि इतर अटी व शर्तींचा गांभीर्याने विचार करा.

## आजारपणाच्या काळात आरोग्यविमा गरजेचाच



राजधानी नवी दिल्लीसह उत्तर भारतातील अनेक शहरांत प्रदूषण वाढल्याने मानवी आरोग्यावर विपरित परिणाम होत आहेत. मुंबई, पुणे, नागपूरसारख्या शहरांत देखील प्रदूषणाची पातळी वाढताना दिसत आहे. परिणामी प्रदूषणामुळे आजारी पडणाऱ्यांची संख्या वाढत आहे. यावरील उपचारापोटी रुग्णांच्या नातेवाईकांना, रुग्णांच्या कुटुंबीयांना खिसा रिकामा करावा लागत आहे. प्रदूषणामुळे येणाऱ्या आजारपणामुळे मासिक आर्थिक गणित बिघडू नये यासाठी सर्वंकष आरोग्य विमा योजना आवश्यक आहे. याप्रमाणे अचानक उद्भवलेल्या आजारपणाचा मुकाबला करण्याबरोबरच आर्थिक आधारही मिळेल.

दिवाळीनंतरच देशातील अनेक भागात हवेतील प्रदूषणात वाढ होत आहे. किमान तापमानात घसरण होत असल्याने हवेतील गुणवत्ता आणखीच ढासळत आहे. देशातील अनेक भागात प्रदूषणाची समस्या वाढत असल्याने नागरिकांना श्वास घेताना त्रास होत आहे आणि घसादुखीचे प्रमाणही वाढले आहे. प्रदूषणामुळे अस्थमा, ब्रोंकायटिस, क्रॉनिक ऑब्सट्रक्टिव्ह आणि पल्मोनरी डिसीज तसेच निमोनियासारखे आजार होऊ शकतात. यावर बराच खर्च करावा लागतो. म्हणूनच चांगली मल्टीकव्हर हेल्थ इन्शूरन्स पॉलिसी असणे अत्यंत गरजेचे आहे.

**विमा पॉलिसीत प्रदूषणाला कवच**

देशात उपलब्ध असणाऱ्या बहुतांश स्टँडर्ड विमा पॉलिसी या प्रदूषणापासून होणाऱ्या आजारपणाला कवच देण्याचे काम करतात. सीओपीडी किंवा अस्थमासारख्या श्वसनविकारासंबंधी आजारपण उद्भवल्यास रुग्णालयात दाखल होण्याची वेळ येते तेव्हा या विमा योजना रुग्णांचे संरक्षण करतात. काहीवेळा रुग्णांना आयसीयूमध्ये देखील राहण्याची वेळ येते. अशावेळी हेल्थ इन्शूरन्स पॉलिसी अत्यंत उपयोगी राहू शकते. आयसीयू किंवा गंभीर स्थितीत रुग्णांची देखभाल करणे गरजेचे राहते आणि अशावेळी आरोग्यविमा महत्त्वाचा ठरतो.

**ओपीडी कवचही असावे**

तुम्ही विमा पॉलिसी खरेदी करत असाल तर पॉलिसीत ओपीडी कवचचा देखील समावेश करावा. प्रदूषणासंबंधित आजारपणासाठी सतत डॉक्टरांच्या संपर्कात राहावे लागते. शेवटी प्रत्येकवेळी शंभर ते दीड हजार रुपयेपर्यंत फीस देणे शक्य राहत नाही. पण विमा पॉलिसीत ओपीडी कवच सामील केल्याने वारंवार शुल्क देण्याची गरज भासणार नाही. अर्थात काही दवाखान्यात दहा दिवसांच्या आत पुन्हा जाण्याची वेळ येते तेव्हा रुग्णाकडून शुल्क घेतले जात नाही. पण सर्वत्र असा अनुभव येत नाही.

**पॅथोलॉजी कवचही गरजेचे**

ओपीडीप्रमाणेच विमा पॉलिसीत पॅथोलॉजीतील चाचणीला किंवा निदानाला कवच असणे आवश्यक आहे. प्रदूषणासंबंधी आजारपणाचा मुकाबला करण्यासाठी विविध तपासण्या कराव्या लागतात आणि त्याचा खर्चही बऱ्यापैकी असतो. मात्र हेल्थ इन्शूरन्स पॉलिसीत पॅथोलिजी किंवा डायग्नोस्टिक कवच असेल तर बऱ्यापैकी उपचाराचा खर्च हा कमी करता येऊ शकतो.

**'सीआय' कवच आवश्यक**

हेल्थ इन्शूरन्स पॉलिसी खरेदी करताना क्रिटिकल इलनेस अर्थात सीआय कवच असावे. हे कवच पॉलिसीधारकास प्रदूषणामुळे होणाऱ्या फुफ्फुसाच्या गंभीर आजारावर उपचारापोटी येणाऱ्या खर्चाला कवच प्रदान करते. शिवाय कर्करोग आणि हृदयरोगाशी संबंधित अन्य गुंतागुंतीच्या उपचारासाठी क्रिटीकल इलनेस कवच उपयुक्त ठरते. फुफ्फुसाचा कर्करोग किंवा हृदयाशी संबंधित आजारांवरचा खर्च हा साधारणपणे २५ ते ३० लाख रुपयांपर्यंत पोचू शकतो. त्यामुळे क्रिटीकल इलनेस कवच असणे गरजेचे आहे.

**विम्यासाठी जादा हप्ता**

अर्थात याप्रकारची विमा पॉलिसी महाग राहू शकते. मात्र उपचारापोटी येणाऱ्या खर्चाच्या तुलनेत हप्त्यापोटी येणारा पॉलिसीवरचा खर्च हा कमीच राहू शकतो. एखाद्या महानगरात दोन व्यक्तीसाठी एक कोटी रुपयांपर्यंतचा आरोग्य विमा असेल तर त्याचा मासिक हप्ता दरमहा १५०० रुपये राहू शकतो. मात्र हप्ता ठरवताना वयाचा मुद्दा देखील महत्त्वाचा असतो.

# रक्तदान शिबिराचा उपक्रम प्रेरणादायी

**पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांचे प्रतिपादन; एक मुखी दत्त मंदिर चौकात शिवगर्जना प्रतिष्ठानच्यावतीने रक्तदान शिबीर**

नगर – रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान समजले जाते. रक्ताची सातत्याने उणीव भासते ती भरून काढण्यासाठी अशी शिबिरे उपयुक्त आहेत. रक्तदान शिबिरे होणे ही काळाची गरज आहे. शिवगर्जना प्रतिष्ठानचा रक्तदान शिबिराचा उपक्रम समाजासाठी प्रेरणादायी आहे, असे प्रतिपादन पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांनी केले.



एकमुखी दत्त मंदिर चौकात शिवगर्जना प्रतिष्ठानच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते. (छाया–उदय जोशी)

एक मुखी दत्त मंदिर चौकात शिवगर्जना प्रतिष्ठानच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते. यावेळी पोलीस निरीक्षक प्रताप दराडे, गर्गे, नितीन तांबोळी, वाल्मीक कुलकर्णी, श्रीपाद धर्माधिकारी, प्रतिष्ठानचे अध्यक्ष विशाल वालकर, संभाजी कदम, दिलीप सातपुते, विजय महाकांळ, ॲड. सुमतीलाल बलदोटा, उपाध्यक्ष महावीर शिंगी, महेश कबाडे, ओमकार शिंदे, गणेश दहिंडे, हेमंत हरबा, किरण बोरा, दादासाहेब बाबर, यशवंत सुंबळकर, अमोल भूमकर, अतुल मुनोत, सुरेश लोळगे, अशोक जाधव, व्यापारी बांधव आदी उपस्थित होते.

विशाल वालकर म्हणाले, शिवगर्जना प्रतिष्ठान मंडळ हे प्रतिष्ठानच्या माध्यमातून वर्षभर विविध उपक्रम राबवते. रक्तदानाची गरज ओळखून हा उपक्रम दरवर्षी करत आहोत. रक्तदान मोहीम राबवुन जीव वाचवण्याचे काम या माध्यमातून सातत्याने करत असून यास चांगला प्रतिसाद मिळत आहे.

# पार्वतीबाई म्हस्के नर्सिंग कॉलेजची उज्वल निकालाची परंपरा कायम





नगर – महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परा वैद्यक शिक्षण मंडळ, मुंबईने घेतलेल्या तृतीय वर्ष जी.एन.एम परिक्षेचा वार्षिक निकाल नुकताच जाहीर झाला असून काकासाहेब मस्के मेमोरियल मेडिकल फाउंडेशनच्या पार्वतीबाई म्हस्के नर्सिंग कॉलेजने १०० टक्के निकाल मिळवत उज्वल निकालाची परंपरा कायम ठेवत दैदिप्यमान यश संपादन केले असल्याची माहिती संस्थेचे कार्यकारी विश्वस्त डॉक्टर सुभाष म्हस्के यांनी दिली.

महाविद्यालयाची विद्यार्थिनी सगळगिळे आकांक्षा विजय हिने विशेष प्राविण्यासह ८१ टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक मिळवला तर निकाळजे प्रीती दीपक हिने ८०.६ टक्के गुण मिळवत विशेष प्राविण्यसह द्वितीय क्रमांक पटकावला. तसेच कडू प्रीती मारुती हिने ८० टक्के गुण मिळवत विशेष प्राविण्यसह तृतीय क्रमांक प्राप्त केला आहे.

यशस्वी विद्यार्थ्यांचे काकासाहेब म्हस्के मेमोरियल मेडिकल फाउंडेशनचे कार्यकारी विश्वस्त डॉ.सुभाष म्हस्के, विश्वस्त डॉ.सुमती म्हस्के, विश्वस्त डॉ.अभितेज म्हस्के, विश्वस्त डॉ. दीप्ती ठाकरे, मुख्य कार्यकारी अधिकारी आर्किटेक्ट समीर ठाकरे, प्राचार्य अजित चवरदार तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

# जीवनातील विविध कसब, कौशल्य आत्मसात करावे

**आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे; सावेडी येथे श्री समर्थ विद्यामंदिर प्रशाला माध्यमिक व उच्च माध्यमिक विभाग स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण**

नगर – विद्यार्थ्यांना ससा व कासवाच्या गोष्टी मधून प्रेरणादायी संदेश दिला आपल्या जीवनामध्ये प्रयत्नात नेहमी सातत्य राखले पाहिजे. अपयशाने खचू न जाता आपण प्रयत्न केले पाहीजे प्रतिकूल परीस्थितीशी सामना करता आला पाहीजे मोबाईल, टिव्ही हे पेटलेली मशाल आहे ही शहाण्या माणसाच्या हातात असेल तर ती स्वत: चा उध्दार करू घेईल सर्व जगाला प्रकाश दाखवेल परंतू चुकीचे माणसात हातात ही मशाल असेल तर ती सर्वत्र आग पेटवत राहील त्यामुळे मोबाईल, टिव्हीचा चांगला वापर केला पाहीजे त्यांच्यावर चांगल्या गोष्टी असतात त्या आपण आत्मसात केल्या पाहीजे स्पधेच्या युगात आपण जीवनात इतर कसब,कौशल्य शिकली पाहीजे गौरवशाली परंपरेचा वारसा असलेल्या प्रशालेमध्ये स्नेहलसंमेलनासाठी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहताना मनस्वी आनंद होत आहे, असे प्रतिपादन आयुक्त यशवंत डांगे यांनी केले.



सावेडीतील श्री समर्थ विद्यामंदिर प्रशाला माध्यमिक व उच्च माध्यमिक विभाग स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण प्रसंगी मनपाचे आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांचा सत्कार करताना माध्य व उच्च माध्य शालेय समितीचे चेअरमन ॲड. किशोर देशपांडे. (छाया – उदय जोशी)

श्री समर्थ विद्यामंदिर प्रशाला माध्यमिक व उच्च माध्यमिक विभाग सावेडी येथे स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण प्रसंगी यशवंत डांगे, कार्यक्रमाचे अध्यक्ष माध्य. व उच्च माध्य. शालेय समितीचे चेअरमन ॲड. किशोर देशपांडे हे होते. श्री समर्थ विद्या प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष दीपक ओहोळ, चेअरमन विकास सोनटक्के, व्हा. चेअरमन श्रीपाद कुलकर्णी, सचिव सुरेश क्षीरसागर, कार्यकारणी सदस्य सौ.संध्या कुलकर्णी, ॲड. वेद देशपांडे, सुनील जोशी, इंजि. सचिन क्षीरसागर, सावेडी माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागाच्या प्राचार्या तथा मुख्याध्यापिका श्रीमती संगीता जोशी, पर्यवेक्षक सुनील कानडे, सावेडी प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सौ. धनश्री गुंफेकर, सांगळे गल्ली माध्यमिक विभागातील मुख्याध्यापिका सौ. वसुधा जोशी, प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक अजय महाजन, शिक्षक प्रतिनिधी सौ. अस्मिता कुलकर्णी, सौ. शिल्पा कुलकर्णी, विद्यार्थी प्रतिनिधी अर्थव लडकत, मयंक मुळे, विद्यार्थीनी प्रतिनिधी कु. संस्कृती सूर्यवंशी, कु. संस्कृती घोलप आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे अध्यक्ष शालेय समितीचे चेअरमन ॲड. किशोर देशपांडे यांनी आपले मनोगत व्यक्त करताना संस्थेच्या नवीन जागेमध्ये चालू असलेल्या बांधकाम इमारतीसमोर विद्यार्थ्यांना अत्याधुनिक पद्धतीने सुसज्ज असे क्रीडांगण उपलब्ध करून देण्यात येणार आहे असे जाहीर केले

कार्यक्रमाच्या सुरूवातीला श्रीमती संगीता जोशी यांनी प्रास्ताविक करताना प्रशालेचा देदीप्यमान प्रगतीच्या व विविध परीक्षाच्या उल्लेखनीय निकाला विषयी माहिती दिली

कार्यक्रमाचे अतिथी व अध्यक्षांचा परिचय माध्यमिक विभाग शिक्षक प्रतिनिधी सौ. अस्मिता कुलकर्णी यांनी केला. वार्षिक पारितोषिक व स्नेहसंमेलन प्रसंगी प्रशालेतील शिक्षक यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमात प्रशालेतील विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या हस्तलिखिताचे उद्घाटन प्रमुख अतिथी यशवंत डांगे व पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले.

संस्थेचे अहवाल वाचन सचिव सुरेश क्षीरसागर यांनी केले. कु. श्रावणी धनेश्वर हिने आपल्या विद्यार्थी मनोगत व्यक्त करताना सर्व शाळेविषयी व शाळेतील शिक्षकांविषयी ऋण व्यक्त केले. कार्यक्रमाची सुरुवात प्रथम समर्थ पूजन व शारदास्तवनाने झाली प्रमुख अतिथीपद व अध्यक्षीय सूचना माध्यमिक विभागाची विद्यार्थीनी प्रतिनिधी कु. संस्कृती सूर्यवंशी हिने दिली व या सूचनेला अनुमोदन उच्च माध्यमिक विभागाची विद्यार्थीनी प्रतिनिधी कु. संस्कृती घोलप हिने दिली.

या कार्यक्रमात गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी विविध गुणदर्शनचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. सूत्रसंचालन सौ. स्वप्ना कलवडे व विविध गुणदर्शन कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती वर्षा पाठक यांनी केले. सौ. सारिका बोठे यांनी आभार मानले. सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व पालकवृंद उपस्थित होते.

# नगरमध्ये १६, १७ जानेवारीला मोफत प्लॉस्टिक सर्जरी शिबीर

नगर – भारतीय जैन संघटना, अहिल्यानगर, चांदमल मुनोत (नेवासकर) पब्लिक ट्रस्ट व जिल्हा शासकीय रुग्णालय यांच्या संयुक्त विद्यमाने २३ वे मोफत प्लॉस्टिक सर्जरी शिबीर १६, १७ जानेवारी २०२५ रोजी सिव्हिल हॉस्पिटल, आयुष बिल्डिंग, तारकपूर रोड, अहिल्यानगर येथे आयोजित करण्यात आले असल्याचे चांदमल मुनोत ट्रस्टचे विश्वस्त किशोर मुनोत, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. एन. एस. चव्हाण, अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. वैजिनाथ गुरवले, राष्ट्रीय कार्यकारिणी सदस्य आदेश चंगेडिया व जिल्हा अध्यक्ष प्रशांत गांधी यांनी कळविले आहे.

या शिबिरामध्ये मुख्यत्वे करून दुभंगलेले ओंठ, चेहऱ्यावरील विद्रूप वर्ण व डाग, नाक व कान यावरील बाह्यव्यंग, पापण्यातील विकृती अश्या प्रकारच्या सामान्य नागरिकांच्या आवाक्याबाहेर असणाऱ्या महागड्या शस्त्रक्रिया विनामूल्य करण्यात येणार आहेत. विश्वविख्यात प्लॉस्टिक सर्जन स्वर्गीय डॉ. शरदकुमार दिक्षित (अमेरिका) यांच्या स्मरणार्थ त्यांचे अमेरिकेतील शिष्य डॉ. राज लाला, ललिता लाला व भारती विद्यापीठातील डॉ. अमित बसनवार यांच्या मार्फत हा मानवसेवेचा महायज्ञ गेल्या २२ वर्षांपासून चालू ठेवण्यात आला आहे.

या शिबिरात नगर येथील डॉ. नूतन फिरोदिया, डॉ. दीपा भळगट, डॉ. सागर पटवा, भारतीय जैन संघटना महिला जिल्हा अध्यक्ष सौ. प्रीतम राका व सचिव सौ. सुवर्णा डागा हे योगदान देत आहेत.

हे शिबीर जरी दोन दिवस चालणार असले तरी रुग्णांची नोंदणी व तपासणी फक्त १६ जानेवारी २०२५ रोजी या एकाच दिवशी सकाळी ९ ते १२ होणार असून उर्वरित वेळी शस्त्रक्रिया पार पडणार आहेत.

शिबिराविषयी अधिक माहितीसाठी अरुण दुगड (९८२२०२७३७३), आदेश चंगेडिया (९०१११५५५९९), प्रशांत गांधी (मो. ८००७०७४०००) यांच्याशी सम्पर्क साधावा.

## रात्रीच्या वेळी संशयितरित्या फिरणाऱ्यास पकडले

नगर – चोरी करण्याच्या, अगर काहीतरी गंभीर गुन्हा करण्याच्या उद्देशाने अंधाराचा फायदा घेऊन संशयित रित्या वावरणाऱ्या एकास कोतवाली पोलिसांनी स्टेशन रोडवरील क्लेरा ब्रूस शाळेच्या मैदानाच्या भिंतीच्या आडोशाला सोमवारी (दि.२३) पहाटेच्या अडीचच्या सुमारास पकडले आहे.

सुरज राजू केदारे (वय २०, रा. उभा मारुती मंदिर मागे, गांधीनगर, बोल्हेगाव) असे या संशयिताचे नाव आहे. कोतवाली पोलीस शहरामध्ये रात्रीच्या वेळी गस्त घालत असताना पहाटेच्या अडीच वाजण्याच्या सुमारास क्लेरा ब्रूस हायस्कूलच्या ग्राउंडच्या भिंतीच्या आडोशाला रोडच्या कडेला सुरज केदारे हा अंधारामध्ये संशयित रित्या फिरताना दिसला. पोलिसांनी त्यास आवाज दिला असता पळू लागला. तेव्हा पोलिसांनी त्यास पाठलाग करून पकडले. याप्रकरणी कोतवाली पोलिसांनी पो. कॉ. अमोल गाडे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून सुरज केदारे याच्या विरुद्ध मुंबई पोलीस कायदा कलम १२२ प्रमाणे गुन्ह्याची नोंद केली आहे.

## भिंगार अर्बन को. ऑप. बँक लि., भिंगार, अहमदनगर.

## सोने तारण दागिन्यांच्या लिलावासंबंधी - जाहीर नोटीस -

खालील नमूद केलेल्या सोनेतारण कर्जदारांना जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आपण बँकेकडे सोनेतारण दागिणे ठेवून कर्जाऊ रक्कम घेतलेली आहे. सदर कर्जाची येणेबाकी व्याजासह सर्व रक्कम करारनाम्याप्रमाणे बँकेकडे भरलेली नाही.

| खातेदाराचे नांव | पत्ता | येणेबाकी |
|---|---|---|
| **पाईपलाईन रोड शाखा** | | |
| कजबे अजय आबा | कजबे वस्ती तपोवन रोड भिस्तबाग अहमदनगर | २७,२७६/– |
| सुसे संतोष पंडित | आत्मज सुसे वस्ती पिंपळगाव उज्जेनी रोड पोखर्डी ता.जि.अ. नगर | १,४०,९२७/– |
| **माळीवाडा शाखा** | | |
| शिंदे सुनिल बापू | मु.पो. कामठी, ता. श्रीगोंदा, जि. अहमदनगर | ८,७४७/– |
| निक्रड विजय परशुराम | मु. मांडवे पो. सांडवे ता. नगर जि. अहमदनगर | ९४,९५४ /– |
| शेख फकिर मो करीम | मु. पो. जेऊर बा. ता.जि, अहमदनगर | १,१८,२२८/– |
| सय्यद शाफिक नासिर | राऊत मळा मार्केट यार्ड मागे अहमदनगर | ६,०३३/– |
| कांबळे शीतल किशोर | प्लॉट नं. १०० पाच गोडावून शाहू नगर, केडगाव देवी अहमदनगर. | १८,३६७/– |
| क्षिरसागर दत्ता सदाशिव | वाघ गल्ली, शेळके वाडा नालेगाव ता. नगर जि. अहमदनगर | १८,९४८ /– |
| **श्रीगोंदा शाखा** | | |
| साळवे अनिल कैलास | मु.साळवे वस्ती लोणी व्यंकनाथ ता. श्रीगोंदा जि. अ. नगर | २१,४०६/– |

आपण बँकेकडून घेतलेले सोनेतारण कर्जाचे येणे रकमेची फेड करारनाम्याप्रमाणे मुदतीत केली नाही. बँकेची सर्व येणे रक्कम भरणा करुन तुमचे दागिणे सोडवून न्यावेत अथवा नूतनीकरण करून घ्यावे. याबाबत आपणांस दिलेल्या पत्त्यावर रजिस्टर पोहोच पावतीने नोटीस पाठविलेली होती. तरी नोटीस प्रसिध्द झाल्यापासून दि. ०१/०१/२०२५ सकाळी ११.३० पर्यंत संपूर्ण रकमेची परतफेड न केल्यास बँकेच्या सोनेतारण कर्ज नियम क्र. ९ अन्वये व करारनाम्या अन्वये बुधवार दिनांक ०१/०१/२०२५ रोजी दुपारी ३.०० वाजता आपण तारण ठेवलेले सोन्याचे दागिणे बँकेच्या प्रधान कार्यालयातील सभागृहात जाहीर लिलावाने विकण्यात येतील. सदर विक्रित खर्चासह सर्व रक्कम वसूल न झाल्यास त्याच्या सर्व परिणामांची जबाबदारी तुमच्यावर राहील.

आपण आपल्या सोनेतारण कर्जाची येणे बाकी होणारे व्याज व इतर खर्चासह होणारी रक्कम दि. ०१/०१/२०२५ सकाळी ११.३० पर्यंत भरुन आपले तारण सोने दागिने सोडवून घ्यावे.

दि. २३/१२/२०२४

**श्री. शशीकांत उमाकांत महाजन** – व्यवस्थापक
**श्री. किसनराव सखाराम चौधरी** – व्हा.चेअरमन
**श्री.अनिलराव मधुकराव झोडगे** – चेअरमन

# माऊंट सिनाय कॉन्व्हेंट स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात

नगर – सारोळा बद्दी येथील माऊंट सिनाय कॉन्व्हेंट स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साही वातारणात झाले. बोल्हेगाव येथील सनराईज इंग्लिश मेडियम स्कूलचे संचालक सुहासकुमार देठे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.



माऊंट सिनाय कॉन्व्हेंट स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन प्रसंगी विद्यार्थी आपली कला सादर करताना.

कार्यक्रमाची सुरवात प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते दिप प्रज्वलन करून व मुख्याध्यापिका जयश्री खरात यांच्या प्रार्थनेने झाली.

यावेळी विद्यालयाचा हेड बॉय अमानत शेख व व्हाईस हेड गर्ल वैष्णवी म्हस्के यांनी विद्यालयचा वार्षिक अहवाल सादर केला.

कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी 'सामाजिक जाणीव' या संकल्पनेवर आधारित वृक्ष तोड, समाज माध्यमाचे दुष्परिणाम, महिला सबलीकरण, क्रीडा, जाहिराती इत्यादी विषयावर समूह नृत्य व नाटिका सादर करून उपस्थितांची मने जिंकली.

प्रमुख पाहुणे या नात्याने बोलताना सुहासकुमार देठे यांनी सर्वांगीण विकासासाठी विद्यार्थ्यांनी अभ्यासाबरोबरच इतर उपक्रमातही सक्रीय सहभाग नोंदविणे आवश्यक आहे असे प्रतिपादन केले. शेवटी ख्रिसमस निमित्ताने येशू ख्रिस्ताचा जन्म सोहळा नाटिकेद्वारे सादर करून कार्यक्रमाची सांगता झाली.

याप्रसंगी रेणुका बानिया यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. पर्यवेक्षिका नेहा केदारे यांनी आभार मानले तर उज्वला पंडित यांनी सूत्रसंचालन केले.

कार्यक्रमास विद्यालयाचे संचालक डॉ. शाम खरात, मुख्याध्यापिका जयश्री खरात, संस्थेचे विश्वस्त सौ. ज्योती हासे व राजेश चक्रे आणि पालक उपस्थित होते.

सदर कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी सर्व शिक्षिकांनी प्रयत्न केले.

# दि इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्सतर्फे 'क्वांटम कम्प्यूटिंग' विषयावर व्याख्यान

नगर – दि इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स (इंडिया) अहमदनगर स्थानिक केंद्राच्या वतीने १९ डिसेंबर रोजी क्वांटम कम्प्यूटिंग अँड इट्स ॲप्लिकेशन्स या विषयावर व्याख्यान झाले. व्याख्यानासाठी के. जे. सोमय्या अभियांत्रिकी महाविद्यालय मुंबई येथील कम्प्युटर अभियांत्रिकी विभागाच्या सहाय्यक प्राध्यापिका डॉ. स्मृती जावकर यांना आमंत्रित करण्यात आले होते.



दि इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स (इंडिया) तर्फे क्वांटम कम्प्यूटिंगवर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

सध्या भारतामध्ये व संपूर्ण जगामध्ये क्वांटम कम्प्यूटिंग हे संगणक क्षेत्रातील अग्रगण्य क्षेत्र आहे. क्वांटम कम्प्यूटिंग हे क्युबिट वर काम करतं. श्यूण्य आणि एक या अवस्थेमध्ये ते काम करते. क्वांटम कम्प्यूटिंग हे ॲप्लिकेशनमध्ये वापरतात, जसे की फायनान्शियल मॅनेजमेंट, सेक्युरिटी, स्मार्ट सिटी, अग्रीकल्चर डोमेन, ट्रान्सपोर्टेशन डोमेन, ट्राफिक सिग्नल डोमेन इत्यादि.

या व्याख्यानमध्ये स्मार्ट सिटी या केस स्टडीवर भर देण्यात आला. स्मार्ट सिटी साठी क्वांटम कम्प्यूटिंगचा कसा वापर करता येईल यावर चर्चा करण्यात आली. जसे की स्मार्ट हेल्थकेअर, स्मार्ट ग्रिड, हे ध्येय साध्य करण्यासाठी क्वांटम कम्प्यूटिंग व मशीन लर्निंग, आर्टिफिशियल इंटेलिजेंस, क्रिप्टोग्राफी चा वापर करून स्मार्ट सिटी ॲप्लिकेशन कसे विकसित करता येईल यावर चर्चा करण्यात आली. सध्या भारतामध्ये आणि पूर्ण जगामध्ये क्वांटम कम्प्यूटिंग विकसित करण्यासाठी कसे प्रयत्न चालू आहेत हे नमूद करण्यात आलं.

व्याख्यानाच्या सुरूवातीला संस्थेचे मानद सचिव प्रा. डॉ. दीपक विधाते यांनी व्याख्यात्यांचा परिचय करून दिला. संस्थेचे अध्यक्ष भारतभूषण भागवत व माजी अध्यक्ष मनोहर अणेकर यांनी सत्कार केला. व्याख्यानाला संस्थेचे सभासद, विद्यार्थी पस्थित होते.

# विद्यार्थ्यांनी मनाने प्रवृत्त व्हावे, पराक्रम दाखववा

**अशोक कडूस यांचे प्रतिपादन**

नगर – शाळेतील दिवस पुन्हा येत नाहीत. कौशल्य विकासाच्या संधी शिक्षक आणि शाळेमुळे आपल्याला मिळतात म्हणून आयुष्यातील हे महत्त्वाचे दिवस आहेत, तेव्हा मनाने प्रवृत्त व्हावे आणि पराक्रम दाखववा, असे प्रतिपादन शिक्षणाधिकारी अशोक कडूस यांनी करून सेवापूर्ती निमित्ताने शुभेच्छा दिल्या.



ज्ञानसरिता माध्यमिक विद्यालयात सेवापूर्ती निमित्ताने मार्गदर्शन करताना माध्यमिक शिक्षणाधिकारी अशोक कडूस.

येथील ज्ञानसरिता माध्यमिक विद्यालयाचे वरिष्ठ लिपिक लक्ष्मण कराळे यांचा सेवापूर्ती कार्यक्रम प्रमुख अतिथी माध्यमिक शिक्षणाधिकारी अशोक कडूस यांच्या उपस्थितीत साजरा झाला.

यावेळी कराळे सरांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला. प्रमुख पाहुणे सहाय्यक पोलीस आयुक्त बाबासाहेब बुधवंत, ॲड. सागर पादीर, प्रकाश डोंगरे सर, दत्तात्रय सप्रे, भाऊसाहेब कचरे, धनंजय शेवाळे, शामराव पिंपळे, अमोल महाराज सातपुते यांनी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रितिका डोंगरे, नुतन डोंगरे यांनी केले. पाहुण्यांचा परिचय सुरेखा घोलप यांनी करून दिला तर आभार शेख सरांनी मानले.

अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष जालिंदर डोंगरे होते. उपसरपंच विजय शेवाळे, ज्ञानसरिता विद्या प्रसारक मंडळाचे पदाधिकारी, ज्ञानदिप विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. रोहोकले, कोतकर सर, झेंडे सर आदी उपस्थित होते.

## मोडी लिपी परीक्षेत सचिन ठाणगे द्वितीय



पारनेर – पुराभिलेख संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई यांच्यावतीने आयोजीत केलेल्या राज्यस्तरीय मोडी लिपी परीक्षेत तिखोल (ता. पारनेर) येथील सचिन ठाणगे यांनी व्दितीय क्रमांक प्राप्त केला. राज्यस्तरीय मोडी लिपी प्रशिक्षण कार्यशाळा अहिल्यानगर येथे घेण्यात आली होती. यामध्ये विभागातून ७२ मोडीलिपी अभ्यासक सहभागी झाले होते. त्यात ठाणगे यांनी प्रथम श्रेणी घेत व्दितीय क्रमांक पटकविला. ठाणगे सध्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळा धोत्रे खुर्द ता. पारनेर येथे शिक्षक म्हणून कार्यरत आहेत.

कार्यशाळा प्रशिक्षक म्हणून विनायक पाटील (कोल्हापूर), लक्ष्मण भिसे (पुणे) यांनी काम पाहिले. तर स्पर्धेच्या आयोजनात न्यू आर्टस, कॉमर्स ॲन्ड सायन्स महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. बी. सागडे, इतिहास विभाग प्रमुख प्रा.डॉ.सागर सप्रे, भरत होळकर, मिना साळे, वृषाली चत्तर यांनी परिश्रम घेतले.

# कत्तलीसाठी चालविलेल्या जनावरांचा टेम्पो पकडला; २७ जनावरांची सुटका, गोरक्षकांच्या मदतीने पोलिसांची कारवाई

नगर – कत्तलीसाठी जनावरे घेवून जाणारा टेम्पो नगर तालुका पोलिसांनी पकडला आहे. या टेम्पोतून २७ जनावरांची सुटका करण्यात आली. जनावरे व टेम्पो असा ७ लाखाचा मुद्देमाल ताब्यात घेण्यात आला आहे. शनिवारी (दि.२१) सायंकाळी सहाच्या सुमारास वाळुंज बायपास शिवारात पोलिसांनी गोरक्षकांच्या मदतीने ही कारवाई केली.

या प्रकरणी चांगदेव गोरख भालसिंग (वय ३२, रा. वाळकी ता. नगर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून तिघांविरूध्द नगर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जावेद शहानवाज शेख (वय ४०, रा. गोविंदवाडी, कल्याण वेस्ट, जि. ठाणे), मुस्तारबा मिरमहमंद शेख (वय ५५, रा. भिवंडी, ठाणे) व राहील ऊर्फ महंमद हुशेन शेख (रा. कल्याण वेस्ट, ठाणे) अशी गुन्हा दाखल झालेल्या तिघांची नावे असून त्यांना ताब्यात घेतले आहे. टेम्पोतून जनावरांची वाहतुक केली जात असल्याची माहिती फिर्यादी व त्यांच्या सहकार्यांना मिळाली होती. त्यांनी सोलापूरकडून कल्याणकडे जाणार्या वाळुंज बायपास रस्त्यावर शनिवारी सायंकाळी संशयित टेम्पो (क्र. एमएच १२ व्हीएफ १३३८) ताब्यात घेतला. त्या टेम्पोत एकुण २७ म्हैस वर्गीय जनावरे मिळून आले. याची माहिती नगर तालुका पोलिसांना देण्यात आली. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. सदरचा टेम्पो व जनावरे असा एकुण सात लाख एक हजार रूपयांचा मुद्देमाल ताब्यात घेतला आहे. अधिक तपास पोलिस अंमलदार मंगेश खरमाळे करत आहेत.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

